
खिडक्या
विजय खाडिलकर

# खिडक्या

विजय खाडिलकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# खिडक्या

लेखक श्री. विजय खाडिलकर
vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com

©esahity Pratishthan®2015

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : ८ नोव्हेंबर २०१५

# श्री विजय खाडिलकर



ईश्कने गालिब निकम्मा कर दिया
वर्ना हम भी आदमी थे कामके...

अशी कथा काही प्रतिभावंतांची नोकरी व्यवसायामुळे होते. प्रतिभा आहे, इच्छाही आहे. पण व्यवसायाच्या रगाड्यात वेळ देता येत नाही. आणि वेळेहूनही महत्त्वाचे म्हणजे पाहिजे तसे खतपाणी घालणारे सर्कल सभोवती नसते.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. त्यांचा आजवरचा साहित्य प्रवास खाली देत आहोत.

खिडक्या, मायबोली प्रकाशन

लालबत्ती, अक्षर प्रकाशन

सरसरती सर. अक्षरमानव

परिक्रमा: शब्दांजली प्रकाशन हे कथासंग्रह व

वसंतचाहूल: अक्षरमानव हा कवितासंग्रह

पारंब्या: अनघा प्रकाशन ..ही कोमसाप स्पर्धेत तृतिय पारितोषिक पात्र कादंबरी..

या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते त्याचबरोबर त्याहून वेगळं लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

त्यांच्याचप्रमाणे पात्रांच्यामागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना तुम्ही काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे.

विजय खाडिलकरांच्या कथा तुम्हाला कशा वाटल्या ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद

टीम ई साहित्य

# प्रास्ताविक

ई-साहित्य ही तशी मराठी साहित्यविश्वासाठी नव्याने रूढ होऊ पहाणारी संकल्पना...

खिडक्या ह्याच नांवाच्या पूर्वप्रकाशित संग्रहातील निवडक कथांची ही छोटी आवृत्ती. भोवताल आणि निरिक्षणं ह्यांना अनुभवाची जोड देऊन शब्दबद्ध करण्याचा हा प्रयत्न. वाचकांना सुटसुटीत वाटावं म्हणून आणि विस्तारभयास्तव इथे मूळ संग्रहातल्या नऊपैकी फ़क्त निवडक तीनच सादर केल्या आहेत.

खिडक्या आणि पाऊस ह्यांच्या नांवातूनच ध्वनित होणाऱ्या अर्थछटांपेक्षा इथे वेगळा अवकाश व त्यातले व्यक्तिविशेष त्यांच्या भाषिक वैविध्यासह सादर करण्याचा प्रयत्न आहे. तसंच नुक्कड ह्या कथेत उपेक्षितांच्या जगण्यातलं वेगळेपण दाखवण्याचा प्रयत्न आहे..ह्या सगळामागे व्यक्त होण्याची कळकळही आहेच..कितपत प्रतिसाद मिळेल हे आत्ताच कळणं कठीण...अनुकूल प्रतिसादाची अपेक्षा आहे.

धन्यवाद..

विजय खाडिलकर<br>
लेखक

मनाच्या कवाडातूनही स्वच्छ आभाळ

दिसत नाही अशांसाठी

ही किंचित शब्दफुंकर !

# अनुक्रम


| कथेचे नांव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|
| १..खिडक्या | अनुभव मार्च २००६ |
| २..नुक्कड | अनुभव ऑक्टोबर २००७ |
| ३..पाऊस | कथाश्री दिवाळी २००७ |

But let there be spaces in your togetherness and let the winds of the heavens dance between you. Love one another but make not a bond of love: let it rather be a moving sea between the shores of your souls.

Khalil Gibran

# .. खिडक्या ..

भर दुपारच्या रणरणत्या उन्हात शिरीन हॉलची एकच खिडकी उघडी ठेवून समोरच्या आरामखुर्चीत बसून होती.डोळे रस्त्याकडे लावून ! मोठया रस्त्यापासून आत जुन्या गांवठाणात अशा बऱ्याच गल्ल्या एकमेकात गुंतलेल्या.ते बंगलीवजा एकमजली घर अशाच एका गल्लीला लागून होतं.त्यामुळे दुपारी शाळा सुटायच्या वेळी गल्लीतून जाणारी उपद्रवी कार्टी उगाच बेल दाबून त्रास देत म्हणून.त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी तिला ही कसरत रोज करावी लागे.आपल्या जडावल्या पापण्याना त्रास देत ती नेहमीच अशी बसून असे...

कधी आरामखुर्चीत तर कधी खिडकीजवळ खुर्ची सरकवून ती बसलेली असे.क्वचित बाजूला तोंड करून असलेल्या समोरच्या घराची एक खिडकी उघडी दिसे.त्यातून त्या घराची थोरली मालकीण मारी मोडक्या हिंदीत तिच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करी.केव्हांतरी पलिकडल्या बैठया घरातली बेनीची ममा काळी मोठीथोरली बॅग घेऊन बाजारात निघाली की आधी समोरच असलेल्या बेनीच्या सासूला आणि नंतर शिरीनलासुद्धा कांही आणायचंय् कां ते कोकणी हेल काढीत विचारून घेई.अर्थात् तो एकतर्फी संवादच असे.कारण शिरीन खुणा करूनच काय ते सांगे. शिरीनला बोलता येत नव्हतं ! तरीसुद्धा ऐकू मात्र व्यवस्थित येत होतं.

खिडकीखालून 'गो शिरीन .. शिरीन ' अशी हांक आली की ती खिडकीशी येई. 'तुका किते जांय् गो ' असं

ऐकल्यावर पंजाने केळयांच्या फण्याची खूण करून सांगे. अलिकडेच गेल्या कांही वर्षांपासून नौशीर हार्टअॅटॅकने गेल्यानंतर तिनं बाजारात जाणं सोडलं होतं. शिरीनला नीट कांही सांगता यायचं नाही.म्हणून बेनीची ममा तिची काळजी घेई.

बारिकसारिक सामान शिरीनची मेड आणून देई .केव्हांतरी मासेवाली दारावर आली तरच ती दार उघडत असे.तेसुद्धा अर्धच. पुढच्या अर्ध्या उंचीच्या दरवाजावरून डोकावून खात्री वाटली तरच ती आतल्या दरवाजाचा अर्धा भाग उघडी. .. ..

‘ ए .. ए ..’ मधेच वरून आलेल्या आवाजाने तिची तंद्री भंगली.आवाज ऐकून आंटी मारी समोरच्या खिडकीत आली नि शिरीनच्या बरोबर वरच असलेल्या खिडकीकडे पहात खुणा करू लागली. ‘किते रे ?’ मारी बहुतेक वरच्या खिडकीत बसलेल्या मालकाच्या वेडसर भावाला कांहीतरी विचारत असावी असं तिला वाटलं.ती सावध होऊन मारीच्या खुणा पहात रहायली. .. ..

वर घरमालक ,त्याची एकुलती आईवेगळी पोर नि हा वेडसर भाऊ रहात. त्याना वापरायला बाजूला गेट नि त्यापुढे जिना होता.त्यामुळे तिचा फारसा संबंध येत नसे.

समोरच्या घरात मारीचा थोरला मुलगा वर रहात असे नि खाली धाकटा.खरं तर दोन्ही सुना सख्ख्या बहिणी होत्या तरी त्यांचं पटत नसे.पण कुठे जाताही येत नव्हतं.कारण घर मारीच्या नांवावर होतं ! संध्याकाळी ऑफिसमधून आल्यावर थोरल्या सुनेचं मालकाच्या मुलीशी केव्हांतरी वरच्यावर बोलणं चालायचं.मारी फक्त हया वेडयाची काळजी वाटून विचारपूस करीत असे.

मारीने हाताने खुणा करून ' गप्प रहा ' असं सांगितलं नि खाली रस्त्याकडे पाहयलं.

समोर तिच्याच दाराकडे ! कुणीतरी वाटसरू तिच्या घराच्या पाय-यांवर बसून हातातलं कांहीतरी खात होता.मारीने खूण करून शिरीनला बोलावलं.ती खिडकीशी आली नि मारीकडे पहात तिने हात झटकले.तो माणूस शांतपणे तिच्या पाय-यांवर बसून खात होता.

तो कांहीतरी घाण करील म्हणून वरून वेडा पासी ओरडतच रहायला. पास्कल त्याचं नांव तरी सर्व त्याला पासी म्हणत.' ऱ्हांव रे पासी. तो जातलो.' असं म्हणत मारी आत गेली.

शिरीनने पुन्हां आपली समाधि लावली. .. ..

वरच्या खिडकीत वेडा पासी नि खालच्या खिडकीत ही शहाणी पण मुकी शिरीन , दोन्ही खिडक्या दिवसाचा बहुतेक वेळ अशाच भरलेल्या.पण उदासवाण्या.वरची दुसरी खिडकी बहुतेक संध्याकाळी बेटी , वरच्या मालकाची ,पासीच्या थोरल्या भावाची एकुलती मुलगी ऑफिसमधून आली की उघडली जायची.

ती कुठल्याशा ट्रॅवल एजन्सीमधे होती.आल्यावर आंटी मारीच्या थोरल्या सुनेशी खिडकीतून गप्पा होत.पण खरं कारण वेगळं होतं.गल्लीच्या वळणावर एका बैठया घरात गोवन लोकांचा एक क्लब होता. तिथला मारिओ गल्फमधे नोकरीला होता.फ्लाइट

बुकींगच्या निमित्ताने बेटीची त्याच्याशी ओळख नि नंतर मैत्री झाली.तो रजेवर आला की मधेच गोव्याला जाऊन यायचा.पण बराच काळ ती दोघं एकत्र फिरण्यात घालवित.हे गुपित आंटीच्या सुनेला माहित होतं.ती कधी दोघांची मेसेंजर व्हायची... ..

अशा हया एकूण वातावरणात दोन खिडक्या मात्र कायम उघडया . एक वरची पासीची नि दुसरी खाली शिरीनची.दोघंही आपली जागा क्वचित्च सोडत.कधीतरी पासीचा भाऊ रॉनी कुत्रयाला आणि पासीला एकदमच फिरायला घेऊन खाली यायचा.वळसा घालून शिरीनच्या खिडकीशी आला की आवर्जून हात वर करून शिरीनची चौकशी करायचा.जुजबी.म्हणजे 'हाऊ आर यू मिसेस् बाटलीवाला ?' अशी. त्याने कधी तिला नावाने हांक मारली नाही नि शिरीनच्या तर बोलण्याचा प्रश्नच नव्हता.सगळा एकतर्फी संवाद.शिरीन नुसती इंचभर जिवणी ताणून हंसायची.बस्स्.

लहान मुलासारखा भांग पाडून पावडर लावलेला कोडाचे डाग असलेला पन्नाशीचा पासी पुढे.शर्ट हाफ्पॅन्टच्या आत खोचलेला शाळकरी मुलासारखा दिसणारा पासी जाणायेणाऱ्या विलेजमधल्या सगळयांशी हंसून कांहीतरी बोलायचा प्रयत्न करी.भाऊ बरोबर नसेल तेव्हां गल्लीच्या टोकाला रहाणारी कांही मराठी मुलं पासीला 'ए , भजीचोर ' अशी हांक मारीत. पासी विलेजबाहेर पडून स्टेशनरोडवर रामण्णाच्या हॉटेलात चोरून जाऊन गुपचूप भजी खायचा म्हणून! ही वरात मग विलेजच्या टोकाला असलेल्या जुन्या चॅपेलपाशी संपे.तिथे छातीवर क्रॉसची खूण करायला मात्र पासी विसरत नसे.

इकडे संध्याकाळी नेमाने शिरीनही फ्रॉक बदलून पावडरचा पफ् फिरवून नि काळे केलेल्या पांढऱ्या केसांवर हात फिरवून पुन्हा तिच्या आवडत्या खिडकीशी येऊन बसे.कुठेतरी अधांतरी बघत.तिचं टोकदार नाक नि केसाची पांढरी बट पाहून मराठी बाया जातायेता तिला निरखून पहात.त्याना तिच्यात इंदिरा गांधी दिसे बहुतेक.! तीही भिंतीवर लटकवलेल्या नौशीरच्या पोर्ट्रे टमधल्यासारखी तिरकी पोझ घेऊन खिडकीच्या मोठया चौकटीत बसलेली असे तेव्हां तशीच दिसे.कधीतरी मासेवालीसाठी दरवाजा उघडला तर आत जाण्याच्या दाराच्या बाजूला नौशीरचा पोर्ट्रेटसारखा मोठा फोटो दिसे , चंदनी हार घातलेला ! त्याच्यासमोरचं हॉलमधलं झुंबर क्वचितच लावलेलं असेल. कदाचित् पटेटीच्या दिवशी.तेसुद्धा तो असतानाच.

चॅपेलमधे कॅन्डल लावून रॉनी पासीला घेऊन घरी आला की मग शिरीनही उठे नि डोक्याला पांढरं फडकं बांधून घरभर धुपाटणं फिरवी.अगदी नौशीरच्या फोटोखालीसुद्धा.

सकाळचे रांगोळीचे छाप तिची मेड काढीत असे.तिची हिंदू सर्व्हंट.मात्र संध्याकाळी शिरीन धूप घालून झाला की ओठ नुसते हलवत घरभर फिरे.बहुतेक झेंद अवेस्तामधली प्रार्थना म्हणत.दिवसभर काळोख्या भिंतीच्या पार्श्वभूमिवर खिडकीच्या चौकटीत पांढ-या पडद्याआडून डोकावणारा तिचा पांढुरका चेहरा संध्याकाळी धूप घालताना मात्र लालबुंद झाल्याचा भास होई!

कदाचित् तिला नौशीरची आठवण येत असेल ! .. ..

वीस वर्षांपूर्वी ती लग्न होऊन इथे आली तेव्हां तिचा सासरा हयात होता.चांगला धट्टाकट्टा, त्या काळच्या रिवाजाप्रमाणे चकचकीत उंच टोपी नि लांब कोट घालणारा सेंट्रल बँकेतून रिटायर्ड झालेला.तो अभिमानाने आपली ओळख करून देताना सांगे.

'आय् ॲम् केकी बाटलीवाला, रिटायर्ड असिस्टंट मॅनेजर फ्रॉम सेंट्रल बँक.'

त्याची टिंगल करण्यासाठी वरचा रॉनी त्याला विचारी , 'देन यू मस्टबी नोइंग दॅट दारूवाला. '

केकीला समजायला वेळ लागे.मग लक्षात येई की हा इंदिरा गांधीच्या वेळच्या दारूवालाचा उल्लेख आहे.तो नुसता हंसे.

खरं तर त्यावेळी रॉनीसुद्धा नौशीरच्याच वयाचा होता.पण म्हातारा त्यालाही मुलासारखाच समजे.कारण केकी बाटलीवाला गोव्याला ब्रँच मॅनेजर असताना रॉनीच्या बापाच्या उपयोगी पडला होता. त्याच्या ओळखीवरच तो इथे भाडेकरू म्हणून आला होता.त्यामुळे रॉनीला त्याला रिस्पेक्ट देणं भाग होतं.शिवाय शिरीनच्या येण्यानेसुद्धा थोडा फरक पडला होता.रॉनीची बायको त्यावेळी होती तेव्हां शिरीनचं तिच्याकडे वरती जाणं होत असे.बेटी चारपाच वर्षांची असताना बोलता येत नसूनसुद्धा शिरीन तिला खेळवायसाठी खाली घेऊन यायची.पटेटी नि खिस्रमसला स्वीटस्ची देवाणघेवाण होत असे.क्वचित् धनसाक नि पॅनकेक हयांची अदलाबदल होत असे.

खुद्द नौशीर चाळीशीला आलेला ;तरी लग्न होत नव्हतं कारण तो थोडा तोतरा होता.

शेवटी केकीच्या कझिनची ही मुकी मुलगी म्हणूहून बापाच्या चिकूच्या बागा सोडून मुंबईला आली. संसार सुरू झाला नि थोडयाच वर्षात म्हातारा टॉवर ऑफ सायलेन्समधे जाऊन विसावला ! .. ..

विलेजमधे बदल होतच राहयले. बाहेरच्या अंगाला असलेल्या बिल्डींगांची उंची वाढली नि दुकानांचं रंगरूप बदलायला लागलं. बाहेर पडेपर्यंतच जी थोडीफार शांतता होती. तीसुद्धा नव्या पिढीच्या स्कूटर मोटरची रहदारी वाढल्यामुळे कमी झाली. तशात गल्ल्या रूंद करण्यासाठी घरांच्या पायऱ्या कमी झाल्या नि पोर्च आत गेली. आता पावअंडीवाला . मासेवालीसाठी शिरीनला बाजूच्या दरवाजाजवळ यावं लागे. पुढच्या दारातला चौक जाऊन एकदम पायऱ्याच झाल्या.

खिडकीखाली येऊन मासेवाली हांका मारी. दोघीना एकदमच. क्वचित् तिघीनाही.

'शिरीनबाय् सरंगे ताजे हायेत्. देव काय् ?'

शिरीनला सरंगे कळायचं नाही. ती हाताने खुणा करून काय असं विचारी.

मग समोरच्या खिडकीशी आलेली आंटी मारी तिला खूण करी.

'गो शिरीन , पॉम्फ्रेट गो.'

शिरीन नको अशी हाताने खूण करी.

मासेवाली चिवटपणे दुसरा सौदा सांगे.'मंग बोंबिल देव्.' पुन्हा नको अशी मान हलली की मासेवाली वर बघे .एव्हाना वरच्या खिडकीतून बेटी डोकावी.ती ऑफिसला जाण्याच्या गडबडीत असे म्हणून तिच्या मेडला खाली पाठवी.

मधेच मासेवालीचा मोहरा आंटीकडे वळे.'आंटी तुला देव गे.'

'नाय गो.झिंगे हानशीन तवा सांग.'

मग मासेवाली शिरीनच्या बाजूच्या गल्लीच्या तोंडाशी बसे.तिथे वरून बेटीची मेड मागच्या जिन्याने येऊन सौदा पटवी.

वरच्या रॉनीची कंपाउंड वॉल नि गेट त्याच्या अगदी जिन्याला लागून झाली.त्यामुळे पुढचा जिना फक्त जायला यायला वापरीत.तशात एकदा जिन्यावरून थेट रस्त्यावर उतरलेल्या पासीला मोटरसायकलचा धक्का लागून फ्रॅक्चर झालं.त्याचं फिरणं बंद झालं.

असाही तो बहुतेक वेळ वरच्या खिडकीतच बसून असे.

खाली शिरीनच्या घरातही बदल झाले.तिचा एक भाचा म्हणजे नौशीरच्या आणि तिच्याही कझिनचा मुलगा त्या कझिनने गळ घातल्यामुळे रहायला आला.टाटाच्या नोकरीतच मुंबईला बदलून आला.जमशेदपूरला कॉलनीत राहयल्यामुळे त्याला असं स्वतंत्र बैठं घर आवडलं.

शिवाय शिरीनची जेवणाखाणाची आबाळ होणार नाही ही सबब त्या बहिणीने पुढे केली.

आता शिरीनला काम असं उरलं नाहीच. तिचा वावर फक्त हॉल नि तिची बेडरूम एवढाच झाला. आतली बेडरूम नि मोठंथोरलं किचन नवी भाचेसून वापरी. तिचा वावरही बाजूच्या दरवाजाने. क्वचित् हॉलमधे आली तरच. फक्त शिरीनला जेवायचं विचारायला.

'आंटी तमारू बोनू खावानू टाईम थयो. आपू के ?' मग शिरीन उठली की दोघी हॉलच्या कोप-यात डायनिंग टेबलजवळ जात. टेबलवर नवीन मॅट आल्या नि हॉलचंही रंगरूप तिने बदललं. पांढरे पडदे जाऊन फॅशनेबल रंगीत पडदे लागले. शिरीनच्या पांढुरक्या चेह-यावर तजेला आला. तसं बेनीच्या ममाने म्हणूनही दाखवलं.'शिरीन तुमारा तब्बेत अब अच्छा हो गया दिखता.' शिरीन नुसतंच हंसली !

आता बेनीची ममाही बाजारात जात नसे. नि समोरची मारी आंटीसुद्धा थकल्यामुळे पडून असे. फारशी खिडकीशी येत नसे. वरचा पासीमात्र प्लास्टर काढल्यावर फिरायला लागला. पण भीतभीतच. वर त्याच्या खिडकीत आता कधी कधी थकलेला रॉनी बेटीची काळजी करत बसे. कारण मधेच केव्हांतरी बेटीचा बॉयफ्रेन्ड मारिओने तो क्लब सोडला. तसा तो गल्फची नोकरी सोडूनच आला होता ; कॉन्ट्रक्ट संपलं म्हणून. पुढे त्याने छोटया मोठया नोकऱ्या करून पाहयल्या. पण कांही जमलं नाही. शेवटी त्याने गोव्याला शिफ्ट व्हायचं ठरवलं.

फारसा शिकलेला नव्हताच.चांगली नोकरीही नव्हती.त्यामुळे बेटीचा इंटरेस्ट संपला.

आता तिच्या वरच्यावर होणा-या गप्पाही संपल्या.कारण मारीच्या सुनेनी त्या दोघांमधली मेसेंजरची भूमिका सोडून दिली.थोडा वेळ उघडणारी वरची एक खिडकी त्यामुळे बंद झाली !

रॉनीला खरं तर बरं वाटलं.कारण बेटी गेली असती तर ..महिन्याच्या खर्चाची सोय काय हा त्याच्यापुढे प्रश्नच होता.खाजगी नोकरीमुळे त्याला पेन्शन नव्हती.पोस्टाचं व्याज कसं पुरणार ? पण एकीकडे त्याला काळजीही वाटत होती.आपल्यानंतर हिचं कोण बघणार?

शिवाय हया वेडया पारसीला ती कशी संभाळील हाही प्रश्न होताच.काळजीच्या चेहऱ्याने तो पारसीच्या खिडकीत बसला की बेनीची ममा त्याला खाली यायला सांगे.

'किते रे रॉनी वैर बोसता.चॅपेलान् वोचना किते ?'

कारण वरच्या खिडकीत रॉनी आणि खालच्या चौकटीत शिरीन. दोघंही उदास चेह-याची माणसं हे दृष्य तिला बघवायचं नाही. त्याना रिझवायसाठी मग ती बेनीच्या मुलाला घेऊन शिरीनच्या खिडकी खाली येई नि तिला बाळ दाखवी.

'देखो शिरीन अमारा ग्रॅंडसन कितना मस्ती करताय् 'शिरीनच्या मख्ख चेह-यावरच्या सुरकुत्या जरा विरळ होत.

मधेच वर बघून ती रॉनीला बाळ दाखवी.बाळाला वर बघायला सांगून म्हणे. 'लुक बेबी.लुक. अप् देअर.अंकल कॉलिंग.' अंकलने हात हलवून दाखवला की बेबीपण हंसून बघे.

पण त्या दोन्ही खिडक्याचं नशीबच उदासवाणं होतं बहुतेक !

रॉनीला आणखीन् एक चिंता लागून राहयली होती. अलिकडे बेटी बंद गळयाचा टॉप घालायला लागली होती नि भोवतालच्या बाया तिच्याकडे संशयाने पहायला लागल्या होत्या.

पारीसारखाच तिच्या मानेवर कोडाचा डाग दिसायला लागला होता. बाप असूनही तरूण मुलीला काय आणि कसं विचारणार ? कदाचित्र त्यामुळेच तर मारिओ तिला सोडून गेला नसेल ? काळजीमधे आला दिवस जात होता. .. ..

केव्हांकेव्हां शिरीनची भाचेसून बाजारात जात असे ; त्या जुन्या विलेजमधून बाहेर पडून स्टेशनरोडला लागल्यावर आधी राममंदिराजवळ थोडी मराठी वस्ती होती नि त्यापुढे कांही मुस्लिम व्यापारी कुटुंबं रहायला आली होती.त्या वळणावर एकदा तिला वरची बेटी एका स्मार्ट पण काळगेल्या मुलाशी बोलताना दिसली.ती त्याना चुकवून तशीच पुढे गेली.

बाजार घेऊन परत आल्यावर धांदल करून ती खिडकीशी शिरीनजवळ आली. 'आंटी , तमे खबर छे के ? उपरनी डिकी त्यां मुस्लिम डिकरासाथे वात करती हती.'

शिरीनने तिच्याकडे आठया घालून पाहयलं.तिला हा अगोचरपणा आवडला नाही.पण ..

पण तिला बोलता येत नसल्यामुळे नुसता हात हलवून गप्प झाली.नेमक्या त्याचवेळी कधी नव्हे ती आंटी मारी समोरच्या

खिडकीत आली.तिने मुस्लिम डिक्रा हे शब्द बहुदा ऐकले नि तिने खूण करायचा अवकाश शिरीनची सून जरा मोठयानेच म्हणाली.

'दॅट गर्ल फ्रॉम टॉप.शी वॉज टॉकिंग विथ मुस्लिम बॉय.'

मारीने अगोदर रस्त्याकडे नि मग वर रॉनीच्या खिडकीकडे पाहयलं.कोणी नव्हतं.मग जरा सुस्कारत म्हणाली.

'नो डिअर.आय नो हिम.ही इज अ हिंदू बॉय.'

एवढयात लांबून बेटी येताना दिसली.जरा खुषीत वाटली म्हणून आंटीने विचारलं 'हाऊ आर यू डिअर ? लुकिंग व्हेरी हॅपी.बोरी हां मू गो ?'

बेटीने नुसतीच मान हलवली नि ती वर गेली.शिरीन नि सून एकमेकींकडे पहात रहायल्या.आश्चर्याने ! घरात बसून हिला बरी खबर लागली.

खरं तर रॉनीला पोस्टात कुणीतरी खबर दिलीच होती.तोही विचारातच होता.कोड पसरलं तर हिचं लग्न होणं मुष्किल.शिवाय पारसीचं वेड हाही एक शाप होताच.पुढच्या पिढीत तेही येईल हया भीतिने कोणी कॅथलिक मुलगा तयार होईल ही आशा खोटी हेही त्याला कळत होतं.काय हरकत आहे ? कदाचित् तो कन्हर्ट व्हायला तयार होईलही.शिवाय विलेजमधलाच तर आहे.फारतर इथेच येऊन राहील.आपलीही सोय होईल... ..

पुढे बेटीने रितसर लग्न केलं ; बापाच्या परवानगीने !

आधी बाप्टाइजड् होऊन जयंतचा जॉय झाला नि मग चर्च वेडिंग झालं. नो रिसेप्शन.

त्याच्या आईवडिलांचा विरोध होताच नि रॉनीलाही जरा अवघड वाटत होतंच. सूट घालून दोघं भाऊ चर्चमधे गेले. बेटीची ऑफिसमधली मैत्रिण तिची मेड झाली नि वेडा पारसी त्याचा बेस्टमॅन झाला. तो अनमॅरिड होता ना ! फारसा खूष नसला तरी रॉनी थोडा रिलॅक्सड् झाला. कारण आईवडिलांची भाडयाची खोली सोडून जॉय चक्क घरजावई झाला !

आंटी मारीने दुरूनच खिडकीतून विश केलं. ती हल्ली बराच वेळ झोपून असे. बेनीची ममा मात्र शिरीनला बोलवायला आली.

'शिरीन चलो ऊपर जाके विश करेंगा.'

दोघींनी मग वर रॉनीच्या घरी जाऊन नव्या जोडप्याचं अभिनंदन केलं. शिरीनने सर्वांना आश्चर्याचा धक्काच दिला ! आपला ठेवणीतला फ्रॉक घालून वर गेलेल्या शिरीनने हातातल्या छोटया पर्समधून आपला जुना एमरल्डचा कानातला टॉप काढून बेटीच्या हातात ठेवला नि तिला गालावर किस् करून विश केलं तेव्हां मात्र बेटीबरोबरच बेनीची ममा नि रॉनीसुद्धा हेलावला .. ..

दिवस जात होते. नवीन जोडपं बरोबरच ऑफिसला जाई. ते बघून रॉनी सुखावे. त्याला वाटे बेटीची काळजी मिटली. पण घरजांवई हळूहळू नखं दाखवायला लागला. त्याची नोकरी साधारणच होती. कुठल्याशा क्लिअरिंग एजंटकडे. अपेक्षेप्रमाणे त्याला

पगार नसावा.घरात पैसे द्यायला तो टाळाटाळ करतोय् हे रॉनीच्या लक्षात आलं.बेटी नवऱ्याला सांभाळून घ्यायचा प्रयत्न करी.त्याला रॉनीची कांहीच हरकत नव्हती.पण तो कारणाशिवाय पासीला त्रास द्यायला लागला.

'पासी गेट मी सम सिगरेटस्' किंवा 'पासी व्हॉट आर यू डुइंग हिअर.गो टू बझार नो."

असं उगाचच त्याला सतवायसाठी सांगे.शिवाय मेडशीही त्याची उगाचच वादावादी चाले.

'जॉय , विल यू जस्ट शट् अप ?' असं एकदा रॉनीला त्याला सांगावं लागलं.

'यू जस्ट पॅम्पर हिम.' हे जॉयचं उत्तर.

रॉनीला संशय यायला लागला की तो आपल्या माणसांशी संधान बांधून असावा.कारण संध्याकाळी स्टेशनवरून परतताना तो बेटीच्या बराच नंतर येई. शिवाय परस्पर त्याने कुठल्याशा बिल्डरशी संधान बांधलं.त्यासाठी त्याने आंटी मारीच्या पोरानाही पटवलं. ती बिचारी अंथरूण धरून बसली.बेटीची खिडकी आता केव्हां केव्हां उघडू लागली.तिथून जावई समोर बेटीच्या मोठया मुलाशी कांहीतरी चर्चा करताना दिसे.खालून आवाज ऐकून आंटी मारी वर पासीच्या खिडकीकडे बघे.रॉनी केव्हांकेव्हां तिथून तिला खूण करी.

खाली शिरीनच्या भाच्यालासुद्धा ब्लॉकचं स्वप्नं पडायला लागलं.खरं तर तो केवळ भाडेकरू होता.समोरासमोरच्या दोन प्रॉपर्टीज् एकत्र डेवलप् करायचा बिल्डरचा बेत असावा.

रॉनीने जावयाला उडवून लावलं.

'डॅडी इटस् अ गुड प्रपोजल.व्हाय डोन्ट यू थिंक ओव्हर ?'

'लीव्ह इट.आय डोन्ट वॉन्ट टु डिस्कस.ॲन्ड फॉर गॉड सेक लिव्ह मी अलोन.'

'देन गिव्ह बेटी ऑर मी पॉवर ऑफ ॲटर्नी.वि विल डील वीथ हीम.'

'यू रास्कल .तू आता आला नि प्रॉपर्टी पायजेल काय ?'

'ओ.के. देन यू डू इट ना.'

'यू गो टू हेल आणि संगाती बेटीलाबी घेऊन जा.' रागाने लाल होत रॉनी बोलला.

नंतर बेटीने नवऱ्याला समजावलं नि प्रकरण तात्पुरतं मिटलं तरी तो मधून मधून बेटीला उकसत राहयला.त्याने पासीला असायलम्मधे पाठवायची सूचना केली तेव्हां मात्र रॉनी संतापला.त्याने सरळच जांवयाबरोबरच बेटीलाही जायला सांगितलं.तो गेला.पण जाताना बेटीला चल म्हणाला नाही.तिला तरी कुठे जायचं होतं. रॉनीला बेटीचाही संशय यायला लागला. कारण थोडयाच दिवसात तिने नोकरी सोडून दिली.बापाची कोंडी करायसाठी !

कारण सांगितलं की जॉयची माणसं वाटेत गांठून त्रास देतात !

बिचारा पासी कावराबावरा झाला.पण हळूहळू शहाणाही झाला.बाहेर जाऊन सामान आणण्याइतका.बेटीचा असहकार होताच.आता तर ती नुसतीच खिडकीत बसू लागली.त्यातच नवऱ्याच्या सांगण्यावरून की काय कोण जाणे पण बेटीने बांगडया मंगळसूत्र घालून कुंकूही लावायला सुरवात केली ! विलेजमधली लोकं चॅपेलमध्ये एकत्र येत तेव्हां कुजबुजायची.

त्यातच खाली शिरीनच्या डोळयांचं कॅटरॅक्सचं ऑपरेशन करावं लागलं.त्या दरम्यान तिच्या भाच्याने जो खर्च केला त्याची भरपाई त्याला हवी होती घर नांवावर करून.म्हणजे भाडेचिठी बदलून.रॉनीने चक्क नकार दिला.

टॅक्सीतून शिरीनला सुनेनी घरी आणली ती गॉगल घालूनच.तिला हया सर्व डेवलपमेन्ट बहुतेक माहित नसाव्यात.तिची तिच्या खिडकीत नेहमीच्या जागेवर पुनर्स्थापना झाली ! पण जरा मागे.शिवाय उजेडाच्या त्रासासाठी पडदा थोडा ओढून घेतला गेला.ती नेहमीच्या पोजमध्ये थोडी तिरकी , खुर्चीत बसून राहयली.पण डोळयांना गॉगल असल्यामुळे ती वेगळीच दिसायला लागली. शिवाय कधी नव्हे तो भाचा तिच्याजवळ येऊन तिची विचारपूस करायला लागला!

आता दुपारच्या वेळी बेनीची ममा तिची विचारपूस करायला येऊन जाई. क्वचित् घरात येऊन पण बहुतेक खिडकीखालूनच.शिरीन कांहीतरी खाणाखुणा करी.त्या बेनीच्या ममाला किती समजत ते तीच जाणे.स्वतः शिरीनही बहुतेक कांही

समजण्याच्या अवस्थेत नसावी. त्यामुळे ती भ्रमिष्ट वाटायची.भरीला डोळयांवरचा गॉगल आणखीनच गूढता निर्माण करी.

आता मात्र रॉनीही भ्रमिष्ट वाटायला लागला.त्या खिडकीचा परिणाम असल्यासारखा.पासी मात्र नियमितपणे बाहेरची कामं करायला शिकला. आता पुढच्या गल्लीतली पोरंही त्याला भजीचोर म्हणून चिडवत नसत. पासी खरोखरच काळजी घेतल्यासारखा पोस्टात जातानासुद्धा भावाच्या आगेमागे रहायला लागला ; जबाबदार माणसासारखा. आणि बेटी खिडकीत बसून रहायला लागली ; नवऱ्याची वाट पहात असल्यासारखी ! .. ..

बरेच दिवस जॉय समोर आंटीच्या पोरांकडेही फिरकला नाही म्हणून रॉनीही पिडा गेली म्हणून निश्चिंत झाला.तरी त्याला भीति होती की खरंच बेटी म्हणते तशी त्याची माणसं तिला रस्त्यात गांठत असतील तर ती पासीलाही असाच त्रास देतील.पण बेटीचं घरातलं वागणं त्याला अजूनही खटकत होतं.

शेवटी बेटीसाठी का होईना तो स्वतःच एकदिवस विलेजमधून बाहेर पडून स्टेशनरोडला गेला.मुद्दाम जॉयच्या गल्लीवरून.त्याला ओळखणारी जवळपासची माणसं त्याच्याकडे विचित्र नजरेनी पहात असल्याचा त्याला भास झाला. वाटेत राममंदिराजवळची माणसंही त्याच्याकडे कींव केल्यासारखी पहात रहायली.पण कोणालाही कांही विचारायची त्याची हिम्मत झाली नाही.जरा पुढे गेल्यावर मुस्लिम वस्तीतल्या एका पोराला सहज बोलल्यासारखा 'हाऊ आर यू ' एवढंच म्हणाला.

चमकून तो पोरगा 'ओ.के.' एवढंच म्हणाला नि थांबला.रॉनीला वाटलं की त्याला कांही बोलायचं असावं.म्हणून तो पुढे म्हणाला.'कैसा चल रहा है इधर ?'

'आपको मालूम नही क्या ?'

'व्हॉट हॅपन्ड ?' रॉनीच्या स्वरात उत्सुकता नि भीति दोन्हीही भरलेली.

'वो जयंतको पुलिस अंदर कर दिया.'

'क्यूँ ?'

'वो बोला करके उस बिल्डरने इधरके मुसाभाईको सुपारी दिया था.मुसाभाई दूसरे लफडेमे फँसा तो उसने सब उगल दिया.फिर वो बिल्डर और जयंत दोनोको ले गये.'

'किसका सुपारी दिया था ?'

'अपनी बिबीको किडनॅप करनेका और .. .. और आपकोभी दम मारनेका.'

तो इसम बोलून गेला नि रॉनीच्या पाायाखालची जमीन सरकली !

'वो बच गई.उसने टिका लगाया था ना तो मराठी लडकोंने उसे छुडाया.लेकिन आपको इस तरह बाहर नही निकलना चाहिये.कभीभी कुछ भी हो सकता था.अब फिकर छोडो.

वो गया सात सालकेलिये.कुछ औरभी लफडे किये है उसने.'

'थॅंक यू.तुम हमको बताया.लेकिन और किसीको मालूम नही है. और बोलनाभी मत.'

आता रॉनीला समजलं की बेटी का मंगळसूत्र घालायला लागली !

कसाबसा रॉनी घरी आला नि खिडकीजवळच्या पासीच्या खुर्चीत बसून हमसून हमसून रडायला लागला.पासी दिनवाण्या चेहऱ्याने त्याच्या पाठीवरून हात फिरवत राहयला.खालच्या समोरच्या खिडकीतून आंटी मारी त्याला खुणा करीत होती.एव्हाना बातमी विलेजमधे पसरली असावी.बेनीची ममा आंटीच्या थोरल्या मुलाला घेऊन वर गेली.नि त्याचं सांत्वन करायला लागली.'आता वोगी व्हांव रे रॉनी.बोरे जाले बेटी थिंगा वोचली ना.'

खालून शिरीनचा भाचाही आला त्याला सॉरी म्हणायला.सारेचजण समजून चुकले की मोठं संकट टळलं.एवढया कोलाहलात दोन माणसं आपापल्या जाग्यावर बसून होती.दार बंद करून बेटी आपल्या खिडकीशी नि ऑपरेशन नीट न झाल्यामुळे डोळयावर धुरकट पडदा आलेली शिरीन खालच्या खिडकीशी.पासीच्या खिडकीशी रॉनीला सोडून सारे परतले.

परत जाताना खालून बेनीच्या ममाने वळून पाहयलं. खालच्या खिडकीशी अंधारल्या डोळयांची नि मुकी शिरीन बसलेली ; स्थितप्रज्ञासारखी ! तिच्या वरच्या खिडकीत रडवेल्या चेहऱ्याचा पासी खुर्चीत बसलेल्या रॉनीच्या पाठीशी उभा.बाजूच्या खिडकीत पाहयलं नि तिला शॉक बसला.तिथे बेटी उदासवाणी बसली होती; पण .. खिडकीच्या कठडयावर हाताचं कोपर टेकून त्यावर हनुवटी टेकून

बसलेल्या बेटीच्या गळयात मंगळसूत्र नव्हतं नि कपाळावर कुंकूही !

ती खरोखरच विधवा झाल्यासारखी दिसत होती. भकास !

चार हताश चेहऱ्यानी त्या तीन खिडक्यांच्या चौकटी भरून गेल्या होत्या नि भारल्यासारखी बेनीची ममा खालून ते पहात होती.

त्या खिडक्यांचं प्राक्तन तेच होतं बहुतेक !!

.. नुक्कड ..

गल्लीच्या कोपऱ्यावरचा फुलवाला येऊन आपलं खोपट बंद करायच्या तयारीत होता. तसे फार वाजले नव्हते.अकराचा सुमार असेल.पण आता देवळात जाणारं कुणी येण्याची शक्यता नव्हती.गल्लीपलिकडे जाणारे लोक क्वचित्च फुलं घेत.शिवाय बाजूच्या चक्कीची पकपकही मंदावली होती.फारशी दळणं नसावीत.मधेच बाहेर येऊन पायरीवरून खाकरा टाकत रामलाल परत आत जाता जाता फुलवाल्याला म्हणाला,

‘क्यों बे जल्दी बंद कर रहे हो.’

‘क्या करे.अभी महाराज मंदिर बंद करेगा.फिर कोन आयेगा’

‘चल रे शिवा.सांगलाय् तां काम कर.तां फुलांचा शिप्तर सुमनबायच्या खोलीवर ने.ओ सुमनबाय..अजयभैया हाय ना घरान् ?’ बाणकोटी फुलवाला हार टोपलीत भरताना त्याच्या पोराला म्हणाला नि मधेच नीराबाईशी गप्पा मारणाऱ्या सुमनबाईला पुकारलं.

रामलाल त्या सुमनबाईकडे तुच्छतेनी पहात हातात त्याचा खास शिंदीचा झाडू घेऊन सांडलेलं पीठ भरायला आत गेला.आपल्या गांववाल्याने ही मराठी बाई अशीच ठेवलेली नि त्यात तिला मूल झालेलं हयाचा रामलालला राग होता.शिवाय ती अजूनही इकडे तिकडे कामं करतच होती.

जवळच्या वाडीत नातलगांकडे राहून कामं करणारी सुमन अजयभैय्याचं काम करता करता त्याच्या प्रेमात पडली नि त्याची

इथली घरवाली झाली.त्याची मुलखात एक बायको होतीच.पण इथलीही सोय झाली नि सुमनला आसरा मिळाला.

नीराबाईशी बोलण्यात व्यत्यय आणल्याबद्दल सुमनबायने चिडून फुलवाल्याकडे बघितलं नि म्हणाली.'रोजरोज तांच तांच काय इचारतास्.जानार कुटे तो मुडद्दा.रात्री पियाला का सकाली घरातच.कामाची बोंब.जा.शिवा उठव जा मुड्याला.'

ती नीरालाही बहुतेक हेच सांगत असावी.

गल्लीच्या डाव्या अंगाला असलेल्या चाळीच्या ओटयावर लोकांची वर्दळ चुकवून नीरा भाजीचे वाटे लावून बसलेली नि तिच्या पुढयात चक्कीच्या पाठच्या अंगाला पत्र्याची शेड बांधून इस्त्रीचा धंदा करणा-या अजयभैय्याची, त्याच्याहून जरा मोठाड वाटणारी ही त्याच्याबरोबर रहाणारी एक मराठी विधवा बाई.दोघी समदुःखी.दोघींच्या गप्पा त्याच.

तशीच वयस्कर नीराबाई पलिकडच्या बैठया चाळीतल्या आपल्या खोलीत एकटीच रहात होती.कांता, तिचा मुलगा आधीच सोडून गेला होता.जराशी समज आल्यावर.कारण हॉस्पिटलमधे काम करणाऱ्या विधवा नीराला कोणाचाच आधार नव्हता.म्हाताऱ्या आईखेरीज.नोकरी मिळाल्यावर तिने खोली घेतली नि गांवाहून आई ला आणि कांताला आणून बिऱ्हाड केलं.तिची नंतर बाबीशेठ कुडतरकराशी झालेली मैत्री सगळयाना माहित होती.नीराच्या आईला नि नंतर अगदी थाटात लग्न करून गांवाहून आलेल्या बाबीच्या बायकोलासुद्धा !

पण कांताच्या मनात अढी होती.कारण बाहेर त्याला कांहीबाही ऐकावं लागे ! जरा जाणता झाला होता.म्हातारी आजी मेल्यावर सरळ निघूनच गेला !

ज्याच्या आधारावर नीराबाईने नोकरी सोडली नि ही सर्व बदनामीही चालवून घेतली तो बाबीशेठ कुडतरकरही नंतर फारसं विचारत नव्हता.एकतर त्याचा गुत्ता पूर्वीसारखा चालत नव्हता नि मुलं मोठी झालेली.शिवाय तो आता सामाजिक कार्यकर्ताही झाला होता. थोडाफार संकोच वाटत होताच. त्यामुळे त्याचं नीराकडे दुर्लक्ष व्हायचं.तीही वयस्कर झालेली त्यामुळे जुनं नातं संपलेलंच होतं.

अजूनही काळया केलेल्या केसांचा कोंबडा पाडून गुळगुळीत दाढी केलेला , हातात अंगठयापोच्या नि गळयात जाडजूड चेनी घातलेला नि पायात पांढऱ्या चपला घातलेला थोडा वयस्कर बाबीशेठ गल्लीतून बाहेर पडताना नीराकडे बघून ओळखीचं हंसे.पण तेवढंच.एरवी त्याचं जाणंयेणं बंदच.नीराही अशाच विचारात गुंतलेली असे.सकाळी भाजी नि संध्याकाळी गुत्त्यात जाणाऱ्यांसाठी कधी तळलेले मासे नाहीतर उकडलेली अंडी घेऊन बसे.पोटाची सोय करायलाच पाहिजे म्हणून. ..त्याच्या जरा पुढे मारवाडी जैनांच्या देरासरमधल्या बायकाही टिपऱ्यांच्या तालावरचं आपलं भजन संपवून आपापल्या आलमिनच्या पेटया नि चौऱ्या गुंडाळून निघायच्या तयारीला लागलेल्या. एवढयात दारात अगदी पायऱ्यांजवळ खेटून एक कार येऊन थांबली. ड्रायव्हरच्या बाजूला बसलेला पांढरे कपडे घातलेल्या पोरगेल्या तरूणाने पायरीवर बसत बसत उतरणाऱ्या एका आजीबाईला हात देऊन उतरायला मदत केली.ड्रायव्हरने दरवाजा उघडून धरला नि ते दोघं आत बसल्यावर गाडी निघून गेली.

हळूहळू देरासरच्या दारातली गायवालीही आवराआवर करायच्या विचारात होती. मागच्या खोपटातल्या भटाने आणून दिलेला हातातला चहा संपवून नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे समोर रस्त्यापलिकडे असलेल्या दुकानातल्या जरा वयस्कर माताप्रसादकडे थोडंफार सामान घेण्यासाठी उठली. तिच्याकडे नेहमीच आशाळभूत नजर लावून बसलेला माताप्रसाद जणू वाटच पहात

असावा.कमरेच्या बटव्यातले पैसे काढून तेलमीठ घेऊन ती वळणार एवढयात जोरजोरात ठक् ठक् आवाज करून टाळया वाजवत टोळधाड आल्यासारखे चार हिजडे गल्लीच्या बाहेर पडून मोठया रस्त्यावर अवतरले.

गायवालीने कमरेला बटवा अडकवताना पदर जराशा बाजूला केला.तिकडे एकटक निरखून पहाणारा माताप्रसाद एकदम सावध झाला नि गल्ल्याचा ड्रॉवर बंद करून मख्ख चेहरा करून बसून राहयला.त्याला आठवलं आज मंगळवार.हया लोकांचा हया मोहल्ल्यातला वार.हिजडयाना पैसे द्यायचं त्याच्या जिवावर यायचं.

त्या चौघांच्या मागून आलेली, पुढून जरासं टक्कल पडलेली नि मोठं कुंकू लावलेली चमकीवाली अम्मा त्यांची मुख्य.गल्लीच्या बाहेर पडताच तिने नेहमीप्रमाणे रामलालच्या पायरीवरच बसकण मारली नि हुकूम सोडायला सुरवात केली.

‘ए चंपा तू नाकेपे जा ये लाईनसे.लेकिन दोपरको मिलना ठेसनपे.और अंजू तू और ये मनकी नीचेके रास्ते चले जाना.’ ही मनकी म्हणजे मेनका.

‘और मै ? मै तेरेसाथ बैठती अम्मा.’ मंजू म्हणाली नि तिने म्हाता-या अम्माच्या शेजारीच रामलालला डोळा मारत पायरीवर बसकण मारली.बसता बसता बाजूला असलेल्या फुलवाल्याच्या पोराचा, अर्धवट वयाच्या शिवाचा गालगुच्चा घेतला.

‘तू क्या पेशल है ? अंदर मत देख.वो रामलाल क्या तेरेसे शादी करेगा ?’

पीठ भरून झाल्यावर जांघा खाजवत फळीच्या आत उभ्या असलेल्या रामलालला कसंसंच वाटलं.पण गुदगुल्याही झाल्या असाव्यात. तोही मग सावध झाला.ही टोळधाड अशी जाणार नाही हे त्याला सरावाने माहित होतं.त्याने पटकन् चिल्लरचा डबाच

उचलून चक्कीच्या वरच्या धान्य टाकण्याच्या पसरट हूडमधे टाकला नि त्यावर धान्य ओतलं.चक्की बंदच होती.

भडक रंगाचं पातळ गुंडाळून लटके नखरे दाखवत नि नसलेले कुले हलवत ती चंपा का कोण ती नाक्याच्या बाजूला वळली.एक गिरकी नि एक टाळी वाजवून घागरा चोळीवाली अंजू ;छाती झाकली न झाकली अशा ओढणीचा पदर गळयाभोवती गुंडाळून खालच्या अंगाला निघाली.

मनकी जरा जास्तच आगाऊपणा करणारी.अंजूच्या मागून जाता जाता देशसरच्या पुढे असलेल्या टेलरला, पदराआड दोन्ही हात घालून नसलेली छाती उंचावून दाखवत डोळा मारून हात पुढे केला नि मिळालेली नोट त्याच चोळीच्या आत सरकवत पुढे निघाली.. ..

खरंतर हे आधीच लक्षात यायला पाहिजे होतं.दर मंगळवारी सकाळीच हे लोक नऊ ते दहाच्या मधे स्टेशनवर एकेकजण करून जमतात.माहिम कां जोगेश्वरीहून, कुठून येतात नि स्टेशनच्या खालीच असलेल्या बुकिंग ऑफिसच्या पुढयात स्टॉलवरून मागून घेतलेला वडा नाहीतर बिस्कूटं चहाशी खात हयांची मीटिंग होते नि सगळे जमले की ठरवाठरव होऊन सगळे पांगतात.आपापल्या गल्ल्यांची नि रस्त्यांची फेरी पुरी करायला.चारच्या सुमाराला सगळया गल्ल्या नि रस्ते , मग सगळे सिग्नल पिंजून झाल्यावर पुन्हा स्टेशनवर चिल्लर मोजून स्टॉलवाल्याला सुटे पैसे देऊन हयांचा त्या दिवसाचा धंदा पुरा होतो...

हे सगळं आठवताना किळसही वाटे पण तरीही वर्षावर्षात गांव नि बायकोमुलाचं तोंड न पाहिलेला रामलाल सैरभैर झाला.स्वतःच्याही नकळत उगाचंच पाठमोरी बसलेल्या त्या मंजूकडे त्याची नजर वळत राहयली.म्हातारी अम्मा नि ती, दोघी मिळून

बटव्यातला खुर्दा नि चोळीत सारलेल्या नोटा मोजण्याच्या उद्योगात गढलेल्या दिसल्या. केवळ उपचारापुरती घागराचोळी नेसलेल्या मंजूची ओढणी गळयाभोवती गुंडाळलेली. त्यामुळे रामलालला तिची उघडी वळकटया पडलेली गुबगुबीत पाठ निरखून पहाण्याचा चाळाच लागला.

त्या उठवळ सुमनबाईचा कितीही राग वाटला तरी रात्री मागच्या भिंतीला कान लावून अजयभैय्याच्या पत्रयाच्या खोलीतली खटखट त्याला अस्वस्थ करी. त्या भिंतीवरच देवीच्या तसबीरीमागच्या कोनाडयात तो जमा केलेल्या नोटा गुंडाळून बारक्या डब्यात लपवून ठेवीत असे. गांवाला पाठवायसाठी. रोज रात्री तसं करताना आपोआपच तो स्वतःच्या नकळत भिंतीला कान लावी !

सगळं आठवताना त्याची सुखद तंद्री लागली नि तो तसाच एकटक त्या मंजूच्या पाठीकडे पहात राहयला. पण पाठीलाही डोळे असणारी बारा गांवं हिंडलेली मंजू हे ओळखून होती. म्हणूनच मधेच मागे वळून भैय्याचा अंदाज घेत होती. त्याला उल्लू बनवून त्याच्याकडनं जास्त पैसे काढण्याच्या विचाराने.

अम्माने विडी पेटवलेली बघून ती झटक्यात उठली नि पायऱ्या चढून चक्कीत शिरली. डब्यांच्या रांगेआडून फळीवरून नजर रोखून बसलेला भैय्या हया अनपेक्षित हालचालींनी चटपटला. मंजूने फळीवरून लांब हात करून त्याच्या गालाना लावला नि एक टाळी वाजवून तळवा पसरला. चोरी पकडल्यामुळे कावराबावरा झालेल्या रामलालने मग स्वीच बॉक्सजवळच्या फळीवरून मुद्दामच ठेवलेली एकुलती एक नोट उचलून त्या हातावर ठेवली.

'बस्स् ? इतनाच ? साले अब्बी मेरी पीठ घुरघुरके देखते शरम नही आई ? और निकाल. दो रूपयेमे चायभी नही मिलती. और तू तो हप्तेमे एकबार देता है. कमसे कम पांचकी पत्ती

तो निकाल.'जोरजोरात दोनचार टाळया वाजवून मंजूने नाराजी दाखवली.

मागे वळून आपले पानानी रंगलेले दात दाखवत अम्मा हंसत होती.कावराबावरा झालेला रामलाल उसनं अवसान आणून जरा जोरात ओरडला.

'लेना है तो ले.नही तो फूट.मोफतमे तमाशा मत कर.'

त्याचा चढलेला आवाज नि मंजूच्या टाळया ऐकून दुकान आवरणारा फुलवाला नि ओटयावर नीराजवळ बसलेली सुमनबाय मुद्दाम उठून आली.तिला तर हया भैय्याची मजा बघायची संधीच हवी होती.तो आपल्या नवऱ्याला चिथवतो असा तिला संशय होता.त्या दोघाना बघून मोठया रस्त्यावरच्या समोरच्याच ब्यूटीपार्लररमधून बाहेर पडणारी मुलगी नि तिच्या मागोमाग दरवाजा उघडून बाहेर डोकावणारी पार्लरची ख्रिश्चन मालकीण दोघीही बघायला लागल्या.तसा हया मंजूला जास्तच जोर चढला.

'अबे लुंगीमे हाथ डालके निकालूँगी.तू कैसा नही देगा देखतीच मै.'

रामलालची पंचाईत झालेली.कारण चिल्लरचा डबा चक्कीच्या हूडमधे धान्यात टाकून दिलेला.आता हया बयासमोर कसा काढणार.एवढयात एका हाताने डोक्यावरची चाऱ्याची पाटी संभाळत नि दुसऱ्यात गाईचं दावं धरून निघालेल्या बाईकडे आशाळभूत नजरेने बघणाऱ्या माताप्रसादचं लक्ष गेलं नि तो हंसत हंसत अम्माला म्हणाला़

'अम्मा संभाल अपनी बेटीको.भैय्याकी लुंगी छुट गई तो गजब हो जाएगा.'

'तो तू है ना.तू दे.चल निकाल.' असं म्हणत अम्मा त्याच्या दारात टाळया वाजवायला लागली.ही नसतीच आफत ओढवून घेतली असं वाटून त्याने बाजूला ठेवलेली नोट तिच्या हातात ठेवली.

'तूभी साला वैसाच कंजुष.'

अम्माला आठवण झाली.हिडीस चाळे करून कमाई करणाऱ्या मनकीच्या मागून गेलं पाहिजे.नाहीतर ती पैसे लपवून ठेवील.तिला नेहमी कायतरी चिजवस्तू घ्यायचा शौक.अम्माने मंजूला आवाज दिला.

'अरी चल री मंजू.खालीपिली माथाफोडी मत कर.उसकी लुंगी छुट जाएगी'

मधेच जोरात टाळी वाजवत अम्मा बाजूच्या मारवाडी ज्वेलरकडे शिरली.हा तिचा खास माणूस.न बोलता नोट सरकवतो.शिवाय चांदीच्या पट्टया किंवा चमकी वगैरे कांही लागलं तर उधार देतो.मघापासून चाललेला मंजूचा तमाशा बघणाऱ्या मारवाडयाने हंसत दिलेली नोट घेऊन अम्मा निघाली तशी मंजू रामलालकडे पाहून बोटं मोडून लटका राग दाखवत म्हणाली.

'माटीमिले.तेरेको तो मै देख लुँगी अगले मंगलवारको.' नि अम्माच्या मागून चालू लागली.पिडा गेली म्हणून रामलालला इशारा करत माताप्रसाद जागेवर बसला.

समोरची पार्लरवाली आत गेली नि फुकट तमाशा बघायला आलेल्या सुमनबाईला आठवण झाली.तिने माताप्रसादकडे जाऊन पाव घेतला नि ती निघाली.दर मंगळवारी ही टोळधाड जाईपर्यंत आंटी मार्था दरवाजा लावून स्वतःला कोंडून घेत असे.मग जाऊन ही सुमनबाय तिचं काम करायची.जाताना तिच्यासाठी पाव घेऊन जायची.

नीराबाई ओटयावर बसते ती बिल्डिंग सोडल्यावर पुढे देऊळ नि त्यापुढे आंटीचं बैठं घर होतं.हत्तीरोगाने पाय अवजड झालेल्या आंटी मार्थाला फार कुठे जाता येत नव्हतं.कधी काळी गल्लीच्या आतला दुसऱ्या कोपऱ्यावरचा बाबीशेठचा देशी बार तिचा होता.म्हणजे तेव्हां हातभट्टीची चालायची.पुढे घरजावई झालेल्या फ्रॅन्सिसने सगळा ताबा घेतला नि खूप पैसा कमावून स्कूलबसचा धंदा सुरू केला.तिकडे भायंदरला प्रॉपर्टी घेतली नि जॅकलीन, मार्थाची एकुलती एक लेक तिकडे निघून गेली.इथलं घर सोडावं लागू नये म्हणून आंटी मार्थाला न घेताच.गुत्ता बंदच झाला होता नि जागा बाबीशेटनी घेतली.तिथे मग सरकारमान्य दुकान झालं नि बाबीशेट एकदम प्रतिष्ठीत नागरिक झाला !

आंटी मार्था अगतिक होऊन एकटीच रहात होती.तशातच म्युनिसिपालिटीची धोकादायक घरं पाडण्याची नोटिस लागली होती.म्हणून घरमालकाने स्वतःच तिथे बिल्डरला आणून बिल्डिंग बांधण्यासाठी; आंटीला घर खाली करण्याचा तगादा लावला होता.तो पैसे द्यायला तयार होता.पण जावई आड आला.त्याला पुढेमागे स्वतःच्या धंद्यासाठी तिथे तळमजल्यावर ऑफिस काढायचं होतं.नाहीतर आंटी नागपाडयाला ओल्डएज होममधे जायला तयार होती.इकडे जावई जागा सोडून देत नव्हता नि तिकडे घरमालक तगादा लावत होता.

तिला पक्का संशय होता कि दर मंगळवारी येणारी ही हिजडयांची टोळधाड मधेच तिच्या दारावर धक्के मारत जाई ते त्या घरमालकाच्या चिथावण्यावरूनच.जागा खाली करून घेण्यासाठी !

बराच वेळ आवाज ऐकू न आल्यामुळे मार्थाने दरवाजा उघडला नि पुढच्या अर्ध्या दरवाजाच्या आडोशाला आरामखुर्ची सरकवून ती दाराकडे डोळे लावून बसली होती सुमनबाईची वाट पहात.तसं तिच्या घरातून सुमनबाईचं खोपट दिसायचं म्हणून तिने बसल्या जागेवरूनच सुमनबाईला आवाज दिला.तिचा जबाब न

ऐकल्यामुळे तिने अजयला हांक मारली.तो आपल्या तारेत काम करत होता.एवढयात दरवाजापुढून बाबीशेटचा अरूण देवळाकडे वळताना दिसला.

'अरे अरू. ते सुमन आली का नाय इचार ते भैय्याला.माला लय भूक लागली बाबा.' अरूणने चालता चालताच भैय्याला आवाज दिला नि दारात खेळणा-या सुमनबाईच्या धाकटया पोराला टपली मारली.

'आय कुटं गेली रे.त्या म्हातारीला भूक लागली.'म्हणत अरूण देवळात शिरला. एवढयातच हातात पाव नाचवीत सुमन आंटीच्या दारात आली.नीराबाईनेही आपलं ओटयावरचं दुकान आवरायला घेतलं होतंच.चालता चालता सुमनने दोन टॉमेटो उचलून घेतले.मार्थासाठी आम्लेट बनवायला. आत शिरता शिरता तिने आपल्या पोराला घरात पिटाळलं नि आत डोकावली तो अजयभैय्या इस्त्री केलेले कपडे घेऊन बाहेर पडत होता.

'किधर थी इतनी देर ? कितना काम पडा है घरमे.'

त्याच्याकडे पहात नाक मोडत ती आंटीच्या घरात शिरली.हल्ली त्यांचं प्रेम कमी होत चाललं होतं बहुतेक.उरली होती ती गरज. दोघांचीही. ..

मोठया रस्त्यावर गल्लीच्या बाहेर दवाखाना नि एखादं विडीशॉप सोडून बंद पडलेला नित्यानंद बार होता.रामण्णाच्या जावयाचा.पूर्वी हा रामण्णा मार्थाकडे यायचा.

तिच्यासारखाच त्याचाही घरजावई आला नि नोकरी सोडून बसला.त्याला बारचंही जमेना तेव्हां बार बंद झाला.अर्धांगाने जागेवर बसलेल्या रामण्णाची बायको केव्हांतरी येऊन जागा

विकायच्या गोष्टी करायची.शटर खाली असल्यामुळे तिच्याकडून त्या हिजडयाना कधीच पैसे मिळायचे नाहीत.पण कधी समोर आलीच तर लाडात येऊन 'मौसी मौसी' करून पाचदहा रूपये उकळायचे.ते टाळायसाठी ती उशीरा यायची.आज तिला येताना नाक्यावर जाणा-या चंपाने गांठलंच नि पाच रूपयांची नोट कमरेच्या बटव्यातून देऊन तिने सुटका करून घेतली.

ती त्याच रागात बाजूच्या बोळातून बारच्या मागच्या बाजूला जात होती.तोच बारच्या मागच्या गल्लीतल्या बैठया चाळीत रहाणा-या बंडलची त्याच्यापेक्षा वितभर उंच नि धिप्पाड बायको जमनी सामोरी आली.कडेवर नातवंड घेऊन.त्याच्या गालाला हात लावून ती हंसली तशी जमनी कांहीतरी बोलायचं म्हणून बोलली.

'काय म्हन्ते ललताम्मा.कशी हाय ?'

'मी बरी हाय.तू कुटं चालली उनाच्या टायमाला धाकल्याला घेऊन ?'

'नाय.सून जेवन बनवतेय ना.तिला कायतरी पायजेल म्हनून जातेय्.' ललताम्मा हंसली नि म्हणाली.

'बंडल काय घरात बसून निस्ता गांजा वढतो काय ? नि तू तेला हानून देते.'

'काय करू बाय.आपला भोग.कामधंदा कधी केलाच नाय मटका बंद झाल्यापास्नं. पन तू कुटे आता मागसून दरवाजा खोलते.बार चालू करते काय? जावयाला तर काय जमते नाय.'

'हां.तो बोलतो लेडीज बार केला तर चालंल.'

'हां.म्हंजे आता तू गल्ल्यावर बस नि मी येते दारू द्यायला.'असं म्हणून हंसत हंसत जमनी गल्लीतून बाहेर आली नि

ललताम्मा मागच्या बाजूने बारमधे.असंच उंदीरघुशींनी केलेली नासधूस बघायला.

मागच्या गल्लीत रहाणा-या पिंटूच्या मंगलोरी बायकोने पिंपळाखाली साईबाबा बसवला होता.पांगा-याच्या जुन्या झाडाला पिंपळ समजून बरेचजण जातायेता हात लावून जात.त्यालाच पार बांधून पाठीमागच्या बाजूला टेबल टाकून ह्या बंडलला मटक्याचं बुकिंग घ्यायला बसवला होता.फक्त ठराविक वेळीच.एरवी तिथेच ही जमनी अंडी घेऊन बसायची.बारच्या मागच्या दरवाजापाशीच.लोकांची तोंडं चुकवून पिणाऱ्या नि मटका लावणाऱ्यांची चांगली सोय केलेली.दोघानी.रामण्णानी नि पिंटूनी.

हा पिंटू म्हणजे गोव्याचा सायबा.पिंटो त्याचं आडनांव.त्याचा पिंटूदादा झाला.म्हणजे आजूबाजूच्या मराठी लोकांनी केला.मागच्या गल्लीतली पहिली खोली त्याचीच होती.जरा उंच वयात त्याने लग्न करून एक मंगलोरीण आणली तेव्हां आजूबाजूच्यानी त्याची रितसर वरात काढली होती.बायकोने मटक्याचा धंदा, शेजार नि पिंटू सगळयाना व्यवस्थित संभाळलं.नि बरोबर ह्या बंडलला.पुढे मटका नि बार दोन्ही एकदमच बंद झाले नि मग बंडल नि जमनी ह्या दोघांचं कामही.तेव्हांपासून बंडल त्याच पारावर बसून चिलीम ओढायला लागला नि मग हळूहळू गांजाही.मुलगा काम करत होता नि बायको संसार रेटीत होती.

ती बहुतेक खालच्या अंगाला मारवाडयांच्या दुकानाला लागून असलेल्या मोरूच्या दुकानावर गांजाची गोळी आणायला चालली होती.दाखवायला पानाची गादी.पण मोरू लपवून ठेवलेल्या गांजाच्या गोळया नि भांगसुद्धा विकायचा. त्याच्या म्हातारीला आवडत नसे तरी. बाराही महिने नाकात झिजून गुळगुळीत झालेल्या मोत्यांची नथ नि कुंकवाचा मोठा टिळा लावणारी ; देवळाच्या गल्लीत वरच्या मजल्यावर रहाणारी मोरूची आई पूर्वी केव्हांतरी

गादीवर बसायची.बाप गावच्या गजाली सांगण्यापलिकडे कांही करत नसे.मुलगा मोठा होईपर्यंत तिने गादी संभाळून संसार ढकलत नेला नि नंतर देवळाच्या ओटयावर बसून टाईमपास करणाऱ्या नि फुकट खाणाऱ्या नवऱ्याला पोसत राह्यली.आताशे नवरा गेल्यापास्नं ती खाली उतरत नसे.मोरूच दुकान संभाळीत होता.

तिची आठवण काढत जमनी माताप्रसादच्या दुकानाकडे वळली.धाकटयाला बिस्कुटं घ्यायला.मधेच तिचं लक्ष पार्लरच्या आतून डोकावणा-या फ्रॉकवाल्या न्हावीणीकडे गेलं.ती तिला न्हावीणच म्हणे.तिने बाबूच्या बायकोचं, सकीनाचं दुकान घेतलं म्हणून जमनीचा तिच्यावर राग होता.

कारण बाबू तेल्याच्या दुकानावरची उधारी बंद झाली होती.बाबूच्या माघारी सकीनाही उधार द्यायची.बाजूलाच नव्याने आलेला माताप्रसाद मात्र उधार कधीच द्यायचा नाही.

...चक्कीसमोरच्या पार्लरच्या जागेत आधी बाबू तेल्याचं दुकान होतं.हमीद त्याचं नांव पण लोकं त्याला बाबू म्हणत नि दुकानाला घाणा.पण तिथे फक्त घाण्यावरचं ताजं तेल विकलं जायचं.शनिवारी लोकं गल्लीतल्या मारूतिला तिथूनच तेलउडीद नेत.बाबू मेमन का कोष्टी होता.तो गेल्यावर त्याचा मुलगा अली क्वचित्च दुकानावर बसला असेल.होता अर्धवट वयाचा. नीराच्या कांताचा तो दोस्त.दोघानी मिळून वर्गणी जमवून गल्लीतल्या छोटया देवळाचा जीर्णोद्धार करवून आणला होता.पण दोघांचंही नशीब एकच.

बापाच्या माघारी अलीलाही असंच कांहीबाही ऐकू आलं नि तोही नोकरीसाठी दूर गेला.बहुतेक दुबईला.जाण्याआधी देवळाच्या ओटयावर बसून कांताशी बोलला.दोघांचंही बहुतेक ठरलं असावं.कांताकडून त्याने मारूतिला हार चढवला नि मग दोघानी

मिळून नित्यानंद बारच्या समोर असलेल्या गैबनशा बाबाच्या दर्ग्यात चादर चढवली.अलिकडे आजुबाजूला दुकानं झाली नि दर्ग्याची जागा आक्रसली तसा वार्षिक उरूस बंदच झाला होता.तरी हिंदू माणसं नेमाने चादर चढवीत नि धूपही घालीत.कारण आता तिथे साईबाबांची तसबीरही लागली होती !

छान जमत होतं पण आता त्यात कांता नि अली दोघंही नव्हते.लोकं आठवण काढीत.पण दोघांच्या आया मात्र आपलं आयुष्य रेटत होत्या.फक्त अलीच्या अम्मीला, सकीनाला दुकानाचे पैसे मिळाले होते.पण आतल्या वाडीच्या दुसऱ्या टोकाला रहाणारा, एकेकाळच्या पिळदार शरिराचं चिपाड करून घेतलेला दामू आता तिथून निघून गेला.मेव्हण्याला खोली देऊन.त्याच्या मेव्हण्याने त्याचं लग्न जमवून दोन कामं साधली.एकतर त्याला खोली मिळाली नि दामूला सकीनाच्या तावडीतून सोडवला.त्याच जागी आता पार्लर झालं होतं. ..

तिकडे रागाने बघत नि हे सारं आठवीत जमनी माताप्रसादकडून बिस्किटं घेऊन मोरूच्या दुकानावर गेलीच.गांजाची गोळी घ्यायला.बंडल बरा आपला गांजाच्या तारेत पडून रहातो साई बाबांच्या घुमटीमागे.केव्हांतरी पिंटूची बायको चहा देते.जुनी ओळख ठेवून.घरात सून कटकट करते त्यापेक्षा बरं.एवढी खमकी जमनी पण सुनेपुढे एकदमच नरम झालेली.कधीकाळी मटक्याचा शौकिन असलेला मोरू बंडलच्या जुन्या ओळखीमुळे त्याला गांजा द्यायचा.इकडे तिकडे बघून देवाच्या तसबीरीमागून हळूच पुडी काढून एक गोळी जमनीच्या हातावर ठेवताना चौकशी करतो.

'कसा हाय बंडलदादा ? काय कामबाम करतो का नाय ?'

'कसला कर्माचा काम.आता तुजी गोळी घालून चिलीम लावली का खल्लास.'

‘मंग कशाला देते तू बी तेला गोळी ?’

‘तूबी कशाला इकतो तुज्या म्हातारीला आवडत नाय तरी बी.तसाच.घरात धत्तिंग करन्यापरीस बरा पडून व्हातोय्.सून सारखी कावते तेच्यावर नि मंग माज्यावरबी.’

‘खरा हाय.ती चार बुका शिकलेली.आपला जलम गेला मटक्यात न् दारूत.’

‘तूबी आता सुदारला.बाप गेल्यापास्ना.म्हातारी येत नाय् खाली ?’

‘नाय.शिक आसते ना.’

‘खरा हाय. जलम गेला गादीवर बसून.आता आराम करू दे म्हातारीला.’

‘तीबी अशीच कटकट करत आसते सारखी.’

‘बाईमानसाचा काय तरास नाय.चल जाते मी.पोर भुकेला आलं आसल.’

जिव्हाळयाच्या गप्पा संपल्या नि जमनी ओटयावरून दुकान गुंडाळणा-या

निराबायकडे वळली.

‘का लवकर बंद करती गं ?’

‘काय करू बसून.तुला काय पायजेल होता काय ?’

‘हां.दोन टामाटे नि मिरच्या दे जराशा.सून रांधतेय् तिला लागन आता.’

तिच्याकडून सामान घेऊन पेंगुळल्या पोराला संभाळत ती निघाली तो पुन्हा गल्लीच्या तोंडाशीच ललताम्मा भेटली.

'चालली काय ?'

'हा.पर तुला टायम असल तवा जरा साफ करायला लागल.उद्यापरवा ये.हेच टायमाला.'

'बगते.टायम भेटला तर येते.'

दोघी दोन दिशाना वळल्या. .. ..

आडबाजूला असल्यामुळे, बार नि मटका बंद झाल्यामुळे मागची गल्ली तशी शांतच असायची.पण पुढची गल्ली , मोठा रस्ता नि आतल्या बाजूची वाडी ह्या सगळयांची तोंडं मिळून झालेला नुक्कड एखाद दुस-या वाहनाचा नि भटक्या कुत्र्यांचा आवाज सोडता दुपार झाल्यावर शांत होत असे.

मारवाडी ज्वेलर आधी देरासरला नि मग आपल्या दुकानाला कुलूप ठोकून जेवायला निघून जायचा.चक्कीच्या कोपऱ्यातल्या चुलीवर शिजवलेला भात खाऊन रामलाल एक फळी लावून बाकड्यावर आडवा व्हायचा.माताप्रसादही एक दार लावून डुलक्या काढायचा.नीरा नि सुमनबाय आपापल्या घरात नि अर्ध्या दरवाजाआडच्या आरामखुर्चीत मार्थाही डुलक्या काढायची.नुक्कड सुस्तावल्यागत व्हायचा.फक्त मोठया रस्त्यावरची खालच्या अंगाची दुकानं किंवा नाक्याकडच्या बिल्डिंगमधली शाळेतून परतणारी पोरं ह्यांचीच काय ती थोडीफार जाग.

तास दोन तास तरी सगळं शांत वाटायचं.

आजही सगळं तसंच झालं नि मग उन्हं उतरताना हळूहळू हालचाल सुरू व्हायला लागली. देऊळ उघडल्यावर फुलवाल्याची नि पुजारीबुवाची लगबग सुरू तशीच ओटयावर नीराबायची. कारण थोडया वेळातच गल्लीच्या टोकाच्या सरकारमान्य दुकानाची वर्दळ सुरू होणार. रामलालच्या चक्कीची पकपक सुरू झालेली. वरच्या अंगाच्या बिल्डिंगमधल्या नि वाडीगल्लीतल्या बायांची दळणघरातली वर्दळही तशीच. देऊळ नि देरासरमधे बायाबापडया दर्शनाला यायला लागलेल्या. सगळं नेहमीसारखंच सुरू झालेलं असताना अचानकच खबर येऊन धडकली.

अंधार पडायच्या थोडं आधीच कामावरून परतणा-या वाडीतल्या कोणीतरी वाडीच्या तोंडाशीच खबर दिली. रेल्वेमधे पाठोपाठ स्फोट झाल्याची नि माणसं मरण्याची !!

बोलता बोलता बातमी पसरत गेली.

दोन्ही गल्ल्यांच्या नि वाडीच्या तोंडाशी माणसं उभी राहून बोलायला लागली. गुत्त्यात नि देवळात किंवा देरासरमधे जाणारे सगळं विसरून काळजीच्या सुरात बोलत राह्यले. मागच्या बॉम्बस्फोटाच्या आठवणी काढत राह्यले. नीराबायचा बांगडयाचा चाकणा तसाच राह्यला. तिला आपल्या लांब रहायला गेलेल्या कांताची आठवण आली.

रामलालने घाबरून उघडलेली एक फळी बंद केली. त्याचं पाहून माताप्रसादने नि मारवाडयानेही तेच केलं. देरासरमधल्या बायाबापडया परत निघाल्यामुळे सेवेकरी एकटाच पायरीवर येऊन बसला. कधी नव्हे ती पिंटूची बायको बोळातून बाहेर येऊन गल्लीत मार्थाला भेटायला गेली. तिची भीति घालवायला. अजयभैय्याने सुमनबायला नि तिने मार्थाला नुकतीच ही खबर दिलेली. मार्था लेकीची नि कॉलेजला जाणा-या नातवंडांची काळजी करायला लागलेली.

मोरूही घोळका बघून मग गाडी बंद करून गल्लीतल्या बिल्डिंगमधे जाताना तोंडाशीच फुलवाल्याजवळ बोलत उभा राह्यला नि त्याला वरून गॅलरीतून बघणारी त्याची आई खुणा करून कांहीतरी विचारायला लागली.गांजाच्या नशेतून बाहेर आलेला बंडलही आपली जागा सोडून मोरूजवळ येऊन थांबला.सगळयांच्या सुरात काळजी होती.कारण सगळयाना जुन्या स्फोटांच्या नि त्याआधीच्या दंगलींच्या आठवणी येत होत्या.

तेवढयात टीव्हीवर कायतरी बघितलेला पिंटूचा मुलगा साई बाबांच्या पाठीमागच्या भींतिवरून उडी मारून अलिकडच्या गल्लीत अरूणकडे आला नि काय काय सांगायला लागला.दोघं गल्लीच्या तोंडाशी येणार तोच बाबीशेट कुठूनसे उगवले.त्यानीही कुठेतरी टीव्हीवर काय बघितलं ते सांगतानाच फुलवाल्याला चादर बनवायला नि बंडलला दर्ग्यात चादर चढवायला सांगितलं.काळजीपोटी नवस बोलल्याप्रमाणे.आजकाल अली नाही नि कांताही नाही.अरूण तसा लहान.कुणाला सांगणार म्हणून लटपटत्या पायाच्या बंडलवर कामगिरी सोपवली नि ते निर्धास्त झाले.

‘आपल्या हंयचा कोणी गावला नाय म्हणजे मिळवली.’ मालवणी हेल काढीत ते बोलले.

गालांवर उजव्या हाताचा तळवा ठेवून त्यांच्याकडे एकटक पहाणारी नीराबाय संधी मिळाल्यासारखी मग ओटयावरूनच बोलली, ‘तुमच्या बाजूवाला पवारमास्तरांचा पोरगा जात असतो ना गाडीतूनच ?’ नोकरी केल्यामुळे ती बरंचसं शुद्ध बोलायची.बाबीशेटना तो कमीपणा वाटायचा.त्यांचे मालवणी हेल काय जात नव्हते.

‘ह्ये वाडीतसून आनि कोण जात होता काय?’बाणकोटी फूलवाला.त्याला आपल्या गि-हाईकांची माहिति होती.

'तेनीच तर खबर दिली न्हाय ?'बंडलला कंठ फुटला.'तो आला तवाच तर कळाला समदा.'

शेट गल्लीत आपल्या घराकडे गेले नि बंडल दर्ग्यात.साई बाबाना सांकडं घालायला.त्याच्या ओटयावरच्या साईबाबांना तो आधीच सांगून आला होता.चादर होईपर्यंत त्याने दर्ग्यात ठेवलेली बारकी डफरी काढून भजन म्हणायला सुरूवात केली.पूर्वी तो मयताच्या भजनात गायचा.

बातमी ऐकून ढवळून निघालेल्या नुक्कडवर चर्चा , काळजी नि मग आपापल्या परीने प्रार्थना सुरू होत्या.कुणी दर्ग्यात, कुणी देवळात तर पिंटूच्या घरात मेरीच्या फोटोसमोर. रात्र पडेपर्य ंत. मग सगळं शांत झालं. नेहमीसारखंच. दुस-या दिवसापासून थबकलेले व्यवहारसुरू झाले.हळूहळू एकेक कळत गेलं.पोलिसांच्या गाडया फिरून गेल्या.मोहल्ल्यात कुणी सांपडलं नव्हतं.पण कुणाच्या ओळखीचं , नात्यातलं कुठे कसं अडकलं हयाची चर्चा सुरूच राहिली...

आठवडा सरला नि पुढच्या मंगळवारी पिंटूच्या साई बाबासमोर चंपा , अंजू नि मनकी एकाएकी उगवल्या नि गळा काढून रडत बसल्या.गांजाच्या तारेतला बंडलही उठून बसला.

जमनी जवळ आली नि पिंटूची बायकोही.नेहमी टाळयांचा ठेका धरून हात पसरणारी ही जमात मयत झाल्यागत छाती पिटून रडतेय् हे अजबच होतं.हळूहळू समजलं की मंजू मागच्या आठवडयात स्फोटात मेली नि अम्मा जबर जखमी होऊन हॉस्पिटलात पडलेय्.विचित्र वाटलं तरी बायामाणसं त्यांचं सांत्वन करत होती.ह्या बाया सिनेमाला गेल्या म्हणून वाचल्या होत्या कुणीही न मागता त्याना चहा नि पैसेही मिळाले.

नेहमी नखरे करणाऱ्या ह्या कशाबशा साड्या गुंडाळून आल्या होत्या.तिथून उठून मग पुढच्या रस्त्यावर आल्या.तोवर खबरही पोचली होती.नेहमीच्या अम्माच्या जागेवर म्हणजे रामलालच्या पायरीवर बसल्या.आज त्यांची लीडर नव्हती नि बहुतेक सकाळची मीटिंगही झाली नसावी.परत एकदा सगळा सीन रिपीट झाला.नेहमीची माणसं चुकचुकत भोवती जमली.आपला गालगुच्चा घेणारी मंजू गेली हे शिवाला कळलं.दारात येऊन उभ्या असलेल्या रामलालला आठवलं. आपल्याला माटीमिले म्हणून गेलेली मंजू नि लुंगी छुट जाएगी म्हणणारी अम्मा आता येणार नाहीत ! त्याला मंजूची उघडी पाठ आठवली नि कससंच झालं . उलटी झाल्यासारखं !

जवळपासच्या सगळयानी मग स्वतःहूनच पैसे जमा केले नि त्यांच्या हातात ठेवले. कधी नव्हे ते गायवालीनेही दिले.एकही टाळी न वाजवता नि फार नखरे न करता त्या उठून खालच्या रस्त्याला निघून गेल्या.सगळे आपापल्या कामाला लागले.रामलाल मंजूने हात लावलेला गाल चोळीत फळया लावायला लागला.नेहमीसारखी दुपार सुस्तावली नि मग नुक्कड नि पुढचा रस्ता दोन्ही एकदमच शांत झाले. सगळा जिवंतपणाच संपून गेल्यासारखे.पुढच्या मंगळवारची वाट पहाण्यासाठी !!

ॐ.. पाऊस..

वरळी सीफेसवरचा डुप्लेक्स फ्लॅट. अकराव्या मजल्यावर हॉलला लागून मोठी टेरेस नि वर बाराव्या मजल्यावर बेडरूमच्या बाल्कन्या. दोन्ही समुद्राकडे फेस करून.

पण दोन्ही बंद. पावसामुळेच नव्हे तर एरवीसुद्धा. कारण घरात घरातल्या माणसांपेक्षा नोकरच अधिक !

त्यातून गेले दोन दिवस पावसाने नुसता कहर केला होता. समुद्रावरून वाऱ्याबरोबर येणाऱ्या पावसाच्या झडीमुळे वरच्या दोन्ही बेडरूमच्या बाल्कन्या बंद नि तेवढयाच रूंदीच्या खालच्या टेरेसची ग्लासडोअर्सही बंद. ओलाव्याच्या भीतीने नोकर पावसाळयात कारपेट गुंडाळूनच ठेवतात. टेरेसमधली झाडंसुद्धा उचलून ठेवावी लागतात.

तरी वरच्या बाल्कन्यांमुळे हॉलला थोडंसं प्रोटेक्शन मिळतं. पण मालकच दिवसभर बाहेर. सकाळी कधी कधी ब्रेकफास्ट घेताना हॉलची ग्लासडोअर्स अर्धी उघडली जातात. रात्री केव्हांतरी ड्रिंक घेताना किंवा डिनरनंतर वरच्या बाल्कनीत उभं रहाता येतं. बस्स्. एवढाच हया जागांचा वापर.

..आज जरा पाऊस उघडला म्हणून अमित बेडरूमच्या बाल्कनीत केनचेअर ओढून ड्रिंक घेत बसला होता. खाली टेरेसमधे नोकर कुंडया पुन्हा लावून ठेवत होता. तेवढाच काय तो आवाज. बाकी फक्त खवळलेल्या समुद्राची गाज नि मंद सुरावटीचं पाश्चात्य संगीत.

या दोन्हीचं गूढ मिश्रण वातावरण मोकळं करीत होतं. दोन नोकरांचीच काय ती जाग. ड्रायव्हर गाडी लावून निघून गेलेला. खरंतर हे असं वातावरण अमितला आवडायचं. म्हणजे त्याने तशी संवयच लावून घेतलेली.

बऱ्याचदा तो असं म्युझिक लावून बाल्कनीत उभा असे. अगदी पाऊस पडत असेल तरीही. समोर अथांग समुद्र डावीकडे नजर टाकली तर पार सिंदिया पॅलेस नि पुढे महालक्ष्मी मंदिर. उजवीकडे कोळीवाडा नि पलिकडे माहिमचा दर्गा. आता नव्याने उभे रहाणारे टॉवर्स मधे अडथळा आणीत.

रिमझिम पाऊस, समोर मंद प्रकाश नि मग हळूहळू होत जाणारा अंधार.....

पेंटहाऊससारख्या या डुप्लेक्सफ्लॅटचं त्याला समजायला लागल्यापासूनच खूप आकर्षण वाटायचं. आबा आणि माई मलबार हीलला शिफ्ट होण्यापूर्वी इथेच रहायचे. अमित त्यांचा नातू. एकटाच मुलगा. पपाममीबरोबर कफपरेडला रहायचा. आणि धाकटा काका आणि आंटी बॅन्ड्रा बॅन्डस्टॅन्डला, लग्नाआधीपासूनच. आंटी ॲंग्लोइंडियन शिवाय त्यांचं हे अफेअर आबामाईना बिल्कुल आवडलेलं नव्हतं. माईच्या आग्रहावरून नाईलाजाने ती हिंदू झाली नि वैदिक लग्न झालं....

अर्थात् हे सर्व त्यावेळी कळत नव्हतं. पण शिफ्ट होताना हा फ्लॅट त्यानी अमितला दिला. कारण तोपर्यंत त्याचं लग्नाचं वय होत आलेलं. अहमदाबादला मॅनेजमेंट डिग्री करून आला की लग्न. एवढंच बाकी होतं. पण ते व्हायचं नव्हतं !....

..आज मात्र सगळंच बिनसत गेलं. ऑफिसमधून कफपरेडला ममाला भेटायला गेला नि तिथून वरळीला येताना ट्रॅफिकमधे अडकला. ह्याच पावसामुळे!....

खरं तर पाऊस त्याला खूप आवडायचा. लहानपणी जरी तो ममापपांबरोबर कफ परेडला रहायचा तरी मधूनच माई आबांना भेटायला ऑपेराहाऊसला येत असे. तेव्हां मरीनलाइन्सवर किंवा चौपाटीवरचा वाकडातिकडा पाऊस अंगावर घेत भटकायला त्याला खूप आवडायचं. माई ओरडायची सर्दी होईल म्हणून...

त्यांचा त्यावेळचा भाडयाचा फ्लॅटही छान होता, अवाढव्य मोठा होता. शेजारची एका डॉक्टरची कन्सल्टींग रूम सोडली तर जवळपास अख्खा मजला त्यांच्याकडे होता. त्यामुळे त्या मोठया हॉलमधे गणपतीच्या दिवसात पाव्हण्यांची खूप गर्दी होई. एखादवेळेस कुणा चांगल्या कलावंताचं गाणंबिणंसुद्धा असायचं. आबाना गाण्याची खूप आवड होती. आबांची बिझनेसमधली प्रगती तिथूनच सुरू झाली म्हणून वरळीला शिफ्ट झाल्यावर सुद्धा श्रद्धेपोटी त्यानी कांही वर्षं तो तसाच ठेवला होता. खालचं गॅरेज तेवढं एका ज्वेलरला दिलं. त्यामुळे ममाच्या मर्जीविरूद्ध तो कधी कधी जायचा माईकडे. पावसात भिजण्यासाठी तरी जावंसं वाटे. तिकडे कफ परेडला ममा जाऊ देत नसे. नि इकडे माई ओरडत का होईना पदराने डोकं पुसून देत असे!..

ज्युनिअर कॉलेजच्या दिवसात तर धमाल करायचा परवानाच मिळाला होता. त्याची आवडती मोटरबाईक नि क्वचित् मागे एखादी मुलगी. तशा तीस पस्तीस वर्षांपूर्वी मुली एवढया बोल्ड नव्हत्या. क्वचित्च तयार होत. तशी फ्रेंडशिप होती. तो होताच तसा तगडा नि देखणा. वर्णाने सांवळा असूनही हॅण्डसम दिसे.. पपांच्या आवडीमुळे नि सोयीसाठी घरातच छोटी जिम होती.

त्यामुळे त्याला व्यायामाची आवड होतीच. आणि मोटरबाईक हा त्याचा मोठा विकपॉईंट होता. थोडा थोराड दिसत असल्यामुळे अठरा वर्षांचा व्हायच्या आधीच तो बाईक वापरायला लागला. मोठा थ्रीलींग एक्स्पीरिअन्स होता.

मात्र मुलींच्या बाबतीत तो थोडा लाजाळू समजला जायचा. माई मधूनच डोस देई. कारण धाकटया काकाचं उदाहरण घरातच होतं ना!...

पुढे निशालाही पावसात भिजणं आवडतं हे समजल्यावर तर त्याला मजाच वाटली. मग सुटीत घरी आल्यावर दोघानी मिळून भिजण्यासाठी तो एखाद्या रविवारी पावसात आपली खास मोटरबाईक काढायचा नि कफ् परेडवरून पेडररोडपर्यंत किंवा कधी वरळीपर्यंत माईला भेटायला भिजत जायचा. अर्थात् वाटेत निशाला सोडून !!...

त्या दरम्यानही एकदा एक छोटा ॲक्सिडण्ट झाला होता. असाच पावसात भिजताना. पण तेव्हां निशा बरोबर नव्हती नि थोडक्यात निभावलं. त्यामुळे एक मात्र झालं. त्याची बाइक जाऊन कार मिळाली ; तेव्हांच बहुतेक पुढच्या प्रसंगाची नांदी झाली असावी.....

...... पपा जाऊन दोन वर्ष होत आली पण ममा कांही वरळीला आपल्याकडे यायला तयार नाही हे त्याच्या मनाला डाचत होतं. तो एकटा असुनसुद्धा. खरं तर त्याला घरात माणसाची गरज होती. जयपूर फूट लावून घरात काय, ऑफिसातसुद्धा

वापरताना त्याला कायम अटेन्डंटची जरूर लागे. गेली सव्वीस सत्तावीस वर्ष त्याने अशीच काढली.......

त्या मोठया कार ॲक्सिडंट नंतर सुरवातीच्या निराशेच्या काळात पहिली पाचसहा वर्षं तो ममापपांबरोबर राहिला कारण माईला त्याची फार काळजी वाटायची. तो सुईसाईड करील म्हणून. तिची काळजी खरी होती. निराशेच्या भरात तसा विचार बऱ्याचदा त्याच्या मनात आलाही होता. विशेषतः निशाला दुरावल्यानंतर ! पण त्याने स्वतःला सांवरलं नि पपांच्या मदतीने बिझनेसमधे गुंतवून घेतलं...

पुढे माई नि आबा थोडया अंतराने गेल्यावर धाकटया काकाने मलबार हीलवर रहाणं सुरू केलं. तेव्हांच अमितने स्वतंत्र रहाण्याचा निर्णय घेतला. पपाना पसंत नव्हतं तरीही. ममा मात्र कांही बोलली नाही. कारण स्वतंत्र राहून तरी तो लग्नाचा विचार करील ही एक आशा तिच्या मनात असावी. एव्हांना तो कंपनीच्या बोर्डावर एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर झाला होता. नि त्याला अंधेरीच्या मेन ऑफिसमधे बऱ्याचदा जावं लागे. आबानीच तशी व्यवस्था करून ठेवली होती, आपले कांही शेअर त्याच्या नांवावर ट्रान्स्फर करून!..

टेक्स्टाईल बिझनेसमुळे पपा सुरतच्या फॅक्टरीला आणि नंतर नवीन घेतलेल्या वुलन फॅक्टरीच्या युनिटला, एम. पी. मधे म्हणजे नागद्याला जाऊन येऊन असत. काका मार्केटिंग नि एक्सपोर्ट बघायचा. अंधेरीच्या मेन ऑफिसमधून. बॅन्द्रा नि अंधेरी जवळच. आबा वयस्कर म्हणून कॉर्पोरेट ऑफिसमधे चर्चगेटला. अशी सगळी कामाची वाटणी झालेली. पुढे आबा गेल्यावर आन्टी

मलबारहीलवरून कॉर्पोरेट ऑफिसमधे जायला लागली, पण थोडे दिवसच. अमित जायला लागेपर्यंतच.....

.. वाऱ्याचा शिरशिरी आणणारा एक झोत नि पाठोपाठ पावसाचे सपकारे तोंडावर आले नि तो भानावर आला. बाल्कनीचं दार बंद केलं तरी शिरशिरी कांही कमी होईना. ड्रिंकची किंचित्शी झांपड वाटत होती ती मात्र कमी झाली.

जेवायच्या इरादाने तो खाली आला. नोकराने त्याला बघून कुकला इशारा केला नि तो प्लेटस् मांडायला लागला.

..टेबलाजवळ बसताना त्याचं लक्ष इतर रिकाम्या खुर्च्यांकडे गेलं. त्यावर क्वचितच कुणी बसत असे. हल्ली तशी वेळच येत नसे. ममा मागच्या बर्थडेला आली होती. एकटीच. पपाना वर्ष व्हायचं होतं. म्हणून त्याने विषय काढला नाही. पण मनातून त्याला उगाचंच वाटत राहयलं की ममा म्हणेल 'मी इथेच रहाते' म्हणून. आजही त्याने विषय काढून पाहिला.

'ममा चल ना थोडे दिवस वरळीला. चेंज म्हणून.' त्याला वाटलं ती म्हणेल 'तूच इथे ये' म्हणून. पण ती गप्पच. एक सुस्कारा सोडून मग म्हणाली,

'तू येतोस ना संध्याकाळचा केव्हांतरी. बास्. दिवसाचा वेळ जातो एन्. जी. ओ. च्या कामात.'

'पपाना जाऊन किती दिवस झाले. आता इथे एकटी कशाला रहातेस? आता तुझं वय आहे कां एकटीने रहाण्याचं?'

‘आलेही असते कदाचित्. तिथे दुसरं कुणी असतं तर. एकटंच रहायचं तर तिथे काय नि इथे काय. काय फरक पडतोय्. ’ पुन्हा एक सुस्कारा. त्याला वाटलं होतं की ती पपाना मिस करतेय्. पण आता तिच्या बोलण्याचा रोख त्याच्या लक्षात आला.

जुन्या गोष्टीना ती स्वतःला जबाबदार धरतेय् बहुतेक. तिला खरंच गिल्टी वाटत असेल कां? कशासाठी? त्याचं ठरलेलं लग्न मोडायला ती एकटीच जबाबदार कशी? परिस्थितीच अशी विचित्र की कोणा एकामुळे कांही बिघडलंय् असं म्हणता यायचं नाही. पण तरीही..

आणि अलिकडे ती बिझनेसच्याही चौकशा करीत नाहीशी झाली. बोलायला विषयच उरले नाहीत. तिचं एनजीओचं काम चालूच होतं. गाडी नि ड्रायव्हर होते; इतर नोकरही होतेच. इतर वेळी वाचनही चाले. पण पपा गेल्यापासून फिरणं, बाहेर टूरवर जाणं मात्र बंद झालं होतं. कांहीही असलं तरी तिने स्वतःला गुंतवून घेतलं होतं.

बिझनेसमधे तिला कधीच इंटरेस्ट नव्हता. कारण तिचं शिक्षण तसं बेताचंच होतं. त्यामुळे माईइतकी नसली तरी ती होती हाऊसवाईफच. बिझनेसमधे असती तर बरं झालं असतं. निदान तिने स्वतःला गुंतवून ठेवलं असतं. शिवाय तिला एक ब्रॉड व्हयू आला असता. म्हणजे कदाचित् तिने त्याच्या लग्नाला विरोध केला नसता. पपांचा तसा नव्हताच.

नि जुन्या पिढीतले असून माईआबांचाही नव्हता. मग तिनेच कां केला असेल विरोध?..

..जेवणाकडे लक्ष लागेना. कुक बनवतो चांगलं म्हणून दोन घास खायचे. एक उपचार म्हणून. एवढंच. कसंबसं संपवून तो हॉलच्या टेरेसमधे आला. इथे जरा कमी झड येत होती. तरी पाऊस कांही थांबायला तयार नव्हताच. तो सिगरेट पेटवून समोरच्या लाटांकडे पहात राहिला. मधेच मान वळवली तर डावीकडे हाजीअलीच्या दर्ग्यावरच्या लाईटची पाण्यात पडलेली प्रतिबिंब नि उजवीकडे कोळीवाडयातला गोंगाट. वाटलं नारळी पौर्णिमा जवळ आली असेल...

पुन्हा नको असूनसुद्धा तोच विषय त्याच्या डोक्यात घोळायला लागला...

पंचवीस वर्षांपूर्वी ती ऑर्थाडॉक्स होती कां? नसावी. कारण काकाच्या बाबतीत खरं तर तिनेच पुढाकार घेतला होता, विशेषतः माईला पटवण्याच्या बाबतीत. मग तिला निशा का आवडली नाही? आवडली नाही की तिचं सोशल स्टेटस् आड आलं? तशी निशाही कांही अगदी सामान्य कुटुंबातली नव्हती. तिचे वडिल ब्युरोक्रॅट. केंद्र सरकारच्या कितीतरी खात्यातून फिरून आलेले. यू. पी. मधे चांगली प्रॉपर्टी करून होते. तीही अहमदाबादला हॉस्टेलमधे रहात होती. तरीही ममाचा लग्नाला कां विरोध होता कुणास ठाऊक. ॲडमिशनच्या वेळी मात्र त्यांची मदत घेतली. ती कशी चालली?

कदाचित् त्याकाळच्या नवश्रीमंतांच्या प्रतिष्ठेच्या विचित्र कल्पना तिच्या डोक्यात असतील. म्हणजे आपलं औद्योगिक घराणं नि ते सामान्य नोकरशहा असलं कांहीतरी. खरं तर माईसारखीच तीही सामान्य कुटुंबातूनच आलेली. तरीही तिचा विरोध. आणि आपणही तिच्या विरोधाला विरोध करायला हवा असून कसे स्वस्थ बसलो?....

.. सिगारेट संपली तरी अमित तसाच उभा होता. समुद्राची गाज नि वाऱ्यापावसाचं संगीत ऐकत! आता पाऊस मंदावला होता तरी त्याच्या रेशमी धारांची सळसळ चालूच होती. त्याच्या त्या जुन्या रेशमी दिवसांसारखीच !..

माई तर क्वचित् चेष्टासुद्धा करायची. सुटीत घरी आल्यावर भेट झाली की माई जेवायला बोलवायची नि चौकशी करायची. आवडीचं कांही केलं की मुद्दाम बोलावून घ्यायची. ममाला आवडायचं नाही तरी. ममाला उगाच वाटायचं माई कांहीतरी भरवून देईल.

नोकराला बाजूला सारून स्वतः वाढताना चेष्टा करायची. म्हणायची,

'तुला कांही आवडीनिवडी नाहीत कां रे? यूपीवाली सासुरवाड तुझी. ते लोकं तर केवढं आगत स्वागत करतात जावयाचं. आणि हे तर तिकडे कोठीवाले म्हणजे प्रतिष्ठितच. गांववाले हंसतील म्हणून तरी तुला वरघोडा पाठवतीलच. ' तो फक्त हंसे. माई पुढे म्हणायची..

'तशी निशा चांगली मुलगी आहे थोडी सांवळी असली तरी. बोलायला कशी आहे रे? तिकडे अहमदाबादेत फिरत असालच ना?'

' अग माई सगळीच मुलं फिरतात. तशीच आम्हीही फिरतो. पण वागते व्यवस्थित. तुमचीसुद्धा चौकशी करत असते मधून मधून. एकदा भेटवीन तुला. मागच्यावेळी नुसती ओझरती पाहिलीस. आता गप्पा मार. '

'पण आधी नको. पुढच्यावेळी तुमची एंगेजमेन्टच ठरवून टाकू. तिचे वडिल दिल्लीहून आले की मग. '

'आणि ममाला कोण समजावणार? तिच्या मनात उत्तरेकडच्या लोकांविषयी काय अढी आहे तिचं तीच जाणे. '

'तिचं जाऊ दे रे. बाबू तिला समजाविल. मी बोलेन त्याच्याशी. अरे तिनेच तर धाकटीला सॅन्ड्राची सुनिता करून घरात आणायचा घाट घातला होता ना. मला पसंत नव्हती तरी. मी आपलं बाळच्या भल्यासाठी तयार झाले. हे सगळं ती विसरली कां?'

उत्तर देण्यासाठी आपण चाचपडतोय् असं लक्षात आल्यावर माईच पुढे म्हणाली.

'एकदा तुझी डिग्री होऊ दे. मग बघ काय करते ते. '

माईच्या स्वप्नाना चौकट नव्हतीच असं अमितला उगाच वाटून गेलं. तो पहिला नातू म्हणून तिने किती स्वप्नं पाहिली असतील. विचार नि फक्त असंख्य विचार....

विरोध म्हणावा तर ॲक्सिडेन्टनंतर ममा स्वतःच तिला मागणी घालायला परत कशाला गेली? गेली नि स्वतःचा अपमान करून घेऊन आली. निशाचे वडिल मनोहर सिंग त्यावेळी मुंबईत थोडया दिवसांसाठी प्रतिनियुक्तिवर आलेले. पेडररोडवर त्यांना क्वार्टर होती. म्हणून निशा अहमदाबादहून परतल्यावर मुंबईतच होती. ती दोघं फिरतसुद्धा. ममाचा विरोध माहित असूनसुद्धा.. पण अमितचा ॲक्सिडेन्ट झाला नि सारं चित्र पालटलं. तोवर ममाचा विरोध निशाला समजला होताच.

ती फक्त ब्रिचकॅन्डीला एकदोनवेळा येऊन गेली. गॅंगरिनमुळे गुडघ्याखालचा पाय ॲम्प्युट केल्यावर तर अमितवर आकाश कोसळलं. तेव्हां त्याला वाटलं होतं कि ती धीर द्यायला येई ल.

पण नाही आली. कां तिच्या घरच्यानी तिला अडवलं? व्यवहारी विचार करून पुढची कुचंबणा टाळण्यासाठी. पण मग तिचं प्रेम हे वरवरचं होतं? दिखाऊ? असेल किंवा... नसेलही कदाचित् तसं. कारण केव्हांतरी ती घरी आली असताना ममाने तिचा इंडायरेक्ट इन्सल्ट केला होता. तिच्या घराण्याची नको ती चौकशी करून. असं एकदा तीच अमितला म्हणाली होती.

'तुम्ही सिंग म्हणजे कुठले? म्हणजे यूपीतल्या कुठल्या भागातले'

ममाला यूपीतली काय माहिती होती; शंकाच होती. तिचं जाणं फक्त शहरी भागात. तेही पपांच्या बरोबर जास्त करून एम्. पी. मधे. निशा उत्तर देण्याच्या फंदात पडली नसेलच बहुतेक.

'तुम्ही कुठल्या समाजाचे? ठाकूर कि कायस्थ वगैरे असलं कांही. ' हीसुद्धा ममाची ऐकिव माहितीच. म्हणजे तुम्ही लोकं हलक्या जातीचे नि दर्जाचे असलं कांहीतरी तिला ऐकवण्याची ही संधी होती. निशाने विषय बदलला नि नंतर निघूनच गेली. तिला कसं आवडणार हे सर्व. कारण सिंग फॅमिलीसुद्धा प्रतिष्ठित होती. हा आपला ममाचा सुपीरियॉरिटी कॉम्प्लेक्स होता असं समजून अमितने तिकडे दुर्लक्ष केलं.

असं असूनही ॲक्सिडेन्ट नि नंतरचे ऑपरेशनचे सोपस्कार झाल्यावर तीच ममा पुन्हा कांहीतरी निमित्त काढून निशाला भेटायला गेली होती; एंगेजमेन्ट केव्हां करूया म्हणून

तिच्या डॅडला विचारायला? व्हिलचेअरवर फिरणाऱ्या आपल्या मुलाची एंगेजमेन्ट तीसुद्धा एकदा नाकारलेल्या मुलीशी. किती निष्ठूरपणा हा ...

सिंगसाहेबसुद्धा पोहेचलेले होते. त्यानी ममाला स्पष्टच सांगितलं म्हणे.

'तुम्ही निशालाच विचारा केव्हां एंगेजमेन्ट करायची ते. पण एंगेजमेन्ट कुणाशी करायची? तिने प्रेम केलं तो अमित आहे कुठे?'

'असं कां म्हणता सिंगसाहेब? निशाचं प्रेम आहे अमितवर. '

'हो. पण तिला ते कुठे मिळणारांय्. '

'कां? अमितचंही आहेच ना. '

'फक्त अमितचं प्रेम घेऊन पुढचे दिवस काढील ती? कारण तुम्हाला तर तिच्या जातपातीची, स्टेटस्ची काळजी आहे. त्या दोघांच्या भवितव्याची नाही. '

'ती आहे म्हणूनच तर आले ना मी. '

'पण जी काळजी तुम्ही आता दाखवताय् ती फक्त तुमच्या पांगळया मुलाच्या भवितव्यासाठी. त्याच्या आधाराची काठी व्हायसाठी तुम्हाला निशाची आठवण झाली. कारण तुमच्या सोकॉल्ड बिझनेस सर्कलमधे तुम्हाला तसं कोणी भेटणार नाही. '

'तुम्ही म्हणता तसं कांही नाहीय्. पण भोवतालच्या परिस्थितीचा विचार करावाच लागतो माणसाला. '

'हो. आणि बदलत्या परिस्थितीत तो बदलावाही लागतो. '

'मग मी काय समजू आता?'

'बदललेली परिस्थिती. ती समजून घ्या. प्रेमासाठी तिने अख्ख्या आयुष्याचा बळी द्यावा हे कितपत योग्य आहे ह्याचा विचार करून वस्तुस्थिती स्वीकारा. '

'ती तर स्वीकारलीच आहे. पण मला आपलं वाटलं की निशाही ती स्वीकारील. '

'तिने स्वीकारलंही असतं कदाचित्. तुम्ही तिची जात आणि वडिलांची पत स्वीकारली असतीत तर. आता वेळ निघून गेलीय्. '

पडल्या चेहऱ्याने ममा तिथून बाहेर पडली. तिच्यापेक्षाही थोडीफार आशा बाळगून असलेल्या माईला मात्र हा फार मोठा धक्का होता..

पुढे निशा दिल्लीला गेल्याचं कळलं तेवढंच. बाकी कांही कळलं नाही. हया धक्कयाने आजारी पडून थकलेली माई नि थोडयाच दिवसानी आबाही गेले? पांचसहा वर्षात सारं घडलं. केवळ माईच्या धाकाने पपांबरोबर राहिलेल्या अमितने मग स्वतंत्र रहाण्याचा निर्णय घेतला. इथे वरळीच्या फ्लॅटवर.

सारं आठवतांना अमितला त्याचा घात करणारी ती पावसाळी काळरात्रही आठवली...

... शिक्षण संपवून परतल्यावर पपांच्या सांगण्यावरून तो अंधेरीला मेन ऑफिसला नुकताच जायला लागला

होता. काकाबरोबर राहून मार्केटिंगची नि एक्सपोर्टची माहिती करून घ्यावी म्हणून. टेक्स्टाईल इंजिनियर असल्यामुळे पपा नेहमी प्लांटच्या व्हिजिटसाठी जायचे. काकाशी त्याचं चांगलं टयूनिंग जमलं होतं. सुटल्यावर काका बॅन्ड्राला निघून जायचा नि अमित पुढे.

संध्याकाळी लॉंग ड्राईव्हची मजा वाटायची. त्यात पावसाची भिजलेली संध्याकाळ नि ओलं वातावरण त्याला भुरळ घालीत असे. अशाच एका संध्याकाळी मजेत परतताना हायवेवरून बॅन्ड्राला येताना तो भयानक ॲक्सिडन्ट झाला !

त्यावेळी फ्लायओव्हर नव्हता नि रस्ता पावसामुळे बुळबुळीत झालेला. त्यामुळे मागून येणाऱ्या रॅबिडने भरलेल्या डंपरने लेन क्रॉस करून ओव्हरटेक करण्याच्या नादात धडक दिली नि तो गाडीबाहेर फेकला गेला तो नेमका एका क्रॉसिंगजवळ ! डावीकडे वळणाऱ्या ट्रकच्या पुढच्या टायरखाली दोन्ही पाय गेले. त्यात एका पायाच्या गुडघ्याखालच्या भागाचा पार चेंदामेंदा झालेला.

तातडीने ऑपरेशन केलं. पण फक्त एका पायाचं. दुसऱ्याच्या हाडांचा भुगा झालाच होता. नि जोडण्यासारखं कांही उरलं नव्हतं. आधी भाभाला पोलिसानी ॲडमिट केलं होतं. मग लिलावतीला आणलं. सगळी माणसं धावली. पपाही पहिल्या फ्लाईटने आले. तिथून पुन्हा ब्रीच कॅन्डीला आणलं. तरी दुसऱ्या पायाचं कांहीच करता येत नव्हतं. शेवटी धोका नको म्हणून तो ॲम्प्यूट करावा लागलाच. हा धक्का पचवून स्वतःला समजावणं अमितला खूप जड गेलं.

त्याच्या आवडत्या पावसानेच त्याचा घात केला होता. हा असाच रिपरिप पाऊस होता ज्याच्यामुळे एवढा मोठा ॲक्सिडेन्ट झाला!

माई नि आबा तर हबकुनच गेले. पण एवढे धीराचे पपाही पार गोंधळून गेले. ममा तर एकदम सुन्नच झाली.

हयाच दरम्यान निशा तिच्या मॉला घेऊन एकदा भेटून गेली. पुढे ब्रीचकॅन्डीलाही आली होती. पण त्यानंतर नाहीच. कदाचित् एकूण परिस्थिती बघून तिच्या मॉने तिला योग्य तो सल्ला दिला असेल? हा आणखी एक धक्का. तो मात्र अमितला पचवावा लागला. विशेषतः ममा तिच्या घरी जाऊन आल्यावर !..

.. अंधार गडद होत चालला, भोवताली नि मनातसुद्धा ! लुकलुकती नक्षत्र तर केव्हांच हया पावसाळी ढगांआड गेली होती. मनावरचं मळभही तसंच होतं. गारव्याची जाणीव झाल्यावर अमित वरच्या मजल्यावर बेडरूमकडे गेला. लॅपटॉप उघडून पुढचं प्लॅनिंग पहायला. तसं फार कांही करण्यासाठी उरलंच नव्हतं. काकाही थकला होता नि अजयला मायग्रेट व्हायचं होतं. कॅनडाला सासऱ्याकडे. त्याचा इंटरेस्ट संपला होता. बिझिनेस एक्पान्शन करण्याची वेळ निघून गेली होती.

आबाना फोरसाईट होती. हे सर्व बहुतेक असंच होणार हे गृहित धरूनच त्यानी काकाची बाजारातून भांडवल उभारण्याची कल्पना साफ धुडकावून लावली होती. दुसऱ्या कुणाचा शिरकाव आणि मग वर्चस्व त्याना नको होतं.

मोठया बिझनेस हाऊसची प्रोप्रायटरी फर्म झाली होती. कारण अजयला त्याचा हिस्सा देण्यासाठी पूलन प्लान्ट विकून टाकायचा होता. मार्केटमधे मंदी होती. एक्स्पोर्ट जवळपास बंदच होता. काकालाही प्लान्टकडे लक्ष द्यायला जमत नव्हतं. निदान वरच्या पैशातून सुरतच्या प्लान्टची प्रॉडक्शन कपॅसिटी

फुल्ली युटिलाईज करता आली असती. बऱ्याच सुधारणा करता येणार होत्या.

पुढच्या आठवड्यात दिल्लीला जावं लागणार होतं. काकाबरोबर. नागद्याच्या प्लान्टचं व्हॅल्युएशन झालं होतं. दिल्लीच्या पार्टीशी बोलणी झाली होती. एक्सपोर्ट एजन्सीच्या थ्रू ॲप्रोच झालेल्या कुणा गारमेन्ट फर्मशी. ती फर्मही त्यांची क्लायन्ट होती. लिगल पेपर तयार होते. शेअर होल्डर नव्हतेच. फक्त सगळया पार्टनर्सच्या सह्या व्हायच्या होत्या. फायनल डील मुंबईत व्हायचं ठरलं होतं. कारण सर्वच कुटुंबीय पार्टनर. शिवाय ऑडिट रिपोर्ट पाह्यल्या शिवाय पार्टी ॲग्रीमेन्ट करायला तयार होणार नाही. ते होईपर्यंत एकदा नागद्याला जाऊन लोकल मॅनेजमेन्टला विश्वासात घेणं गरजेचं होतं. त्यांच्या नोकरीचा प्रश्न होता. आबांच्या वेळचे नसले तरी कितीतरी लोकं केवळ त्यांच्यावरच्या विश्वासाने टिकून होते.

ठरवलं तरी त्याला एकटयाला कांहीच जमणार नव्हतं कारण तो एकटा कुठे जाऊयेऊ शकत नव्हता आणि नागद्याला तो क्वचितच गेला होता. तेही पपांबरोबर. नंतर त्याचं असं झाल्यामुळे पपा विजयला बरोबर नेत. त्यातून हया पावसांच्या दिवसात फ्लाई टचा गोंधळ. नि दुहेरी प्रवास. होईल ते होईल असा विचार करून तो झोपण्याच्या तयारीला लागला...

.. जायच्या दिवशी पावसाची रिपरिप सुरूच होती. भल्या सकाळी ड्रायव्हर नि अटेन्डन्ट एअरपोर्टवर सोडायला आले. हल्ली तेच त्याचे सगेसोयरे नि केअरटेकर झाले होते. खरं तर

काका पिकअप् करू शकला असता. पण त्याला स्वतःला ते पसंत नव्हतं. कुणी किंव करावी ह्याची त्याला विलक्षण चीड यायची. शिवाय अजय विजयवरून संबंध जरा ताणलेलेच होते. आदल्या दिवशीच फोनवर बोलणं झालं होतं.

'फायनल डीलच्यावेळी तरी अजयने इथे असायला हवं. तरच पार्टीला इथे बोलवण्यात अर्थ आहे.' त्याने काकाला जाणीव करून दिली. परदेशी जाण्यासाठी अजय उतावळा झाला होता आणि आंटीची त्याला फूस होती. कदाचित् तिलाही तिथे जायचं असावं.

'येईलच. आता तो फॅमिलीला पोहोचवायला गेलाय् ना. शिवाय तिथेही त्याची कांही डीलींग्ज् व्हायची असतील.'

'म्हणजे तो इथला पैसा तिथे गुंतवणार आहे तर. 'त्याची शंका खरी होती.

'तसंच असणार. बहुतेक. '

'पण ह्यात रिस्क आहे. तेही बाहेरच्या कंपन्या डेवलपिंग मार्केट म्हणून इथे पैसा ओतायला तयार असताना. '

'रिस्क घेतल्याशिवाय बिझनेस कसा होणार डिअर?'

'एनीवे. पण पार्टी डील झाल्यावर त्यालाही आपल्याशी ॲग्रीमेन्ट करायला हवं. त्याला वेळ तर लागणारच आहे.'

'पाहू या. पण तू फ्लाईटला वेळेवर पोहोचशील ना? ड्रायव्हरला सांगितलंय्स ना?'

'डोन्ट वरी. ते मी मॅनेज करीन. बाकी फ्लाईटवर बोलू. बाय्.'

काकाने फोन ठेवला तरी त्याच्या मनात संशय बळावला. हळुहळू काकाही आपला शेअर काढून घेणार तर. चांगलं नांव कमावलेला बिझनेस मग बंद होणार बहुतेक. आपल्या असहाय्यतेचा फायदा घेतायत. दुसरं काय!

त्याला खरं तर ममाच्या फोनची अपेक्षा होती. आदल्या दिवशी तो तिला सगळं सांगून आला होता. तिची प्रतिक्रिया एकदम थंड. मागितली की सही करायची एवढंच. कुणासाठी सारी धडपड करायची असाही तिचा विचार असेल कदाचित्. आपलं जर व्यवस्थित झालं असतं तर आबांच्या स्वप्नांना आकार देता आला असता. नि काकाचीही हिम्मत झाली नसती असं करण्याची हा विचार त्याला अस्वस्थ करून गेला....

... दौरा व्यवस्थित पार पडला. पण पावसाच्या साक्षीनेच. विशेषतः नागपूरपेक्षा दिल्लीला पावसाने पिच्छा पुरवला. नागपूरच्या लोकल मॅनेजमेन्टची लोकं जरा इमोशनल झाल्यासारखी वाटली. पुढे दिल्लीला पार्टीच्या सॉलिसिटर्सकडे मीटींग झाली. ' सिंग असोसिएट्स' हया पार्टीतर्फे कुणी हजर नव्हतं त्यामुळे पार्ट नर्स कोणीच भेटले नाहीत. नंतर एका मॉलमधल्या त्यांच्या बुटिक्ला भेट दिली. तेव्हां मात्र तो चक्रावला कारण त्यांचं कलेक्शन आणि प्रेझेन्टेशन त्याला एकदम परिचयाचं वाटून गेलं. वाटलं हयामागे कुणा जाणकाराचा हात असावा जो आपल्या माहितीचा आहे...

.. सकाळचा चहा ब्रेकफास्ट झाल्यावर अमित वरच्या बाल्कनीत उभा होता.

आज दिल्लीच्या पार्टीबरोबर साऊथ बॉम्बेतल्या एका मोठया हॉटेलमधे मीटिंग ठरवली होती. नंतर लंच. खरं तर नांवालाच शिल्लक असलेल्या कॉर्पोरेट ऑफिसच्या कॉन्फरन्स रूममधे ठेवता आली असती. पण काकाचा काय इंटरेस्ट होता कुणास ठाऊक सगळयाच गोष्टी एकदम पॉश करण्याकडे त्याचा कटाक्ष होता; बहुतेक पार्टीला खुष करण्यासाठी असावा. एकदा डील झालं की थोडी जबाबदारी कमी होणार होती. शिवाय सगळया पार्टनर्सना एकत्र यायला सोपं हे निमित्त होतंच सांगायला. तेवढंच फॅमिली गेट टुगेदर ! फॅमिली होतीच कुठे म्हणायला. त्याच्या बाजूने तो एकटाच. नि ममा. बस्स्.

काकाच्या डोक्यात काय चाललंय् हे कळत नव्हतंच पण ममाही त्याला मूक संमती देत होती. विरक्त झाल्यासारखी ! असं अमितला उगाच वाटलं. डोक्यात विचारांचं काहूर घेऊनच तो तयारीला लागला.

नेहमीच्या वेळी ड्रायव्हर आल्यावर तो मार्गस्थ झाला; त्याला उत्साह वाटत नव्हता तरी.

सगळी मंडळी हॉटेलवरच जमणार होती. अगदी ममासुद्धा. बाहेर पहाण्याच्या प्रयत्नात गाडीच्या बंद कांचेवरचे पावसाचे ओघळ न्याहाळीत असताना त्याला एक अभिनव कल्पना सुचली की इथेही व्हायपर असायला हवे होते. तो स्वतःशीच हंसला. शक्य असतं तर ऑटोमोबाईलवाल्या कुणीतरी ती कल्पना अंमलात आणलीच असती की !..

.. गाडी हॉटेलच्या पोर्चमधे घेतल्यावर ड्रायव्हर वळून येण्याआधीच दरवान दार उघडायला पुढे झाला. हे नेहमीचंच होतं.

पण त्याचा उपयोग नाही हे फार थोड्या लोकांना माहित होतं. नेहमीच्या हॉटेलवाल्याना. स्वतःच्या ड्रायव्हरच्या मदतीशिवाय तो बाहेर पडूच शकत नसे.

आताही तसंच झालं. ड्रायव्हरच्या मदतीने बाहेर पडल्यावर तो पायऱ्यांजवळ पोहोचला नि स्वतःच चढण्याच्या नादात त्याचा तोल गेला. तेवढयात कुणीतरी हात पुढे केला नि त्याने स्वतःला सांवरलं. मग त्याच्या लक्षात आलं, हात स्त्रीचा होता. त्याने चमकून वर पाहिलं.

तोच तो सांवळा पण रेखीव चेहरा नि तसेच काळेभोर खोल डोहासारखे शांत पण मिस्किल डोळे, ज्याची त्याला कधीकाळी भुरळ पडली होती. पण आता ते आर्जवीपणे पहात होते. निशा. इतक्या वर्षानी ती अशी समोर येईल हे अपेक्षित नव्हतं म्हणून तो क्षणभर गोंधळला. पण स्वतःला सांवरून पुढे झाला नि किंचित् हंसला.

'सरप्राईज. ' एवढाच एक शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडला. तीही हंसली. अगदी तसंच. पूर्वीसारखंच पण खळाळून नाही. म्हणाली,

'बट इज इट अ स्वीट सरप्राईज ऑर.. '

'ऑफकोर्स. ' त्याने स्वतःला सांवरत उत्तर दिलं....

क्षणभरात त्याच्या बऱ्याच गोष्टी लक्षात आल्या. वाढत्या वयाचा फारसा परिणाम दिसत नव्हता. फक्त पेहराव बदलला होता. साडी तिला शोभून दिसत होती नि ती नेसलीही होती ग्रेसफुली. केसांचा बॉब पण वयाला शोभेलसा. सगळंच कसं

सोबर. कसलाही भडकपणा नाही. दिखाऊपणा तर आधीही नव्हताच. तिच्या गळयाकडे नजर गेली उगाच शोध घेतल्या सारखी. कांहीच नव्हतं नि उत्तरेकडच्या लोकांप्रमाणे भांगात सिंदूरही नव्हता ! म्हणजे?

ही प्रश्नचिन्हं त्याची पाठ सोडत नव्हती.

कसं रिॲक्ट व्हावं हे न कळल्यामुळे दोघेही हळूवार पावलं टाकित रिसेप्शनमधे गेले.

‘इथे बसूया थोडावेळ? इफ यू डोन्ट माइंड. ’

त्याला हो ना म्हणण्याचं सुचलंच नाही. सोफ्यात बसताना पुन्हा आधाराची गरज भासली.

तिने अभावितपणे हात पुढे केला नि त्यानेही संवय असल्यासारखा तिचा आधार घेतला.

बसताना उगाच वाटून गेलं; हे असं पूर्वीच घडलं असतं तर....

मागोमाग आलेल्या ड्रायव्हरकडून ब्रीफकेस घेऊन त्याला हातानेच जाण्याची खूण केली नि तो तिच्याकडे वळला. ‘सो, आफ्टर सो लॉंग... आय् नेव्हर एक्स्पेक्टेड यू टु बी हिअर. ’

आश्चर्याचा भर ओसरायला वेळ लागला. मनातला उफाळणारा उत्साह नि त्यामागे दडलेली थोडीफार कडवटपणाची भावना चेहऱ्यावर नि शब्दात व्यक्त होणार नाही हयाची पुरेपूर काळजी घ्यावी लागणार होती. मधे बराच काळ गेला होता नि तो आता एका कंपनीचा डायरेक्टर होता. पण तिच्या चेहऱ्यावर ह्यातलं कांहीच कसं दिसत नाही ह्याचं मात्र त्याला नवल वाटलं.

'बट् आय न्यू यू आर कमिंग. आफ्टरऑल इट्स यूअर बिझनेस डील. आणि.. इफ आय नो यू वेल तू ते कधीच मिस करणार नाहीस. ' तोच हळूवार पण आग्रही स्वर. पण त्याला संदर्भ कळेना.

'तुला कसं कळलं?'

'कारण हे डील आमच्या ग्रूपबरोबरच आहे. मला वाटलं नेगोसिएशन झाल्यावर तुला कळलं असेल.'

'काय?'

'हो. तुमचा नागद्याचा प्लान्ट आम्ही म्हणजे माझा भाऊ नि मी टेक ओव्हर करतोय'

अजून एक आश्चर्याचा धक्का. त्याला पार्टीबद्दल जी माहिती कळली होती त्यात पार्टनर्स कोण हया गोष्टीत त्याने कांहीच इंटरेस्ट दाखवला नव्हता. सगळं डील काकाच बघत होता.

पण काकाला हे निशा प्रकरण फारसं माहित असण्याची शक्यता नव्हती. आणि ममा तर धड कसलेच पेपर्स वाचत नव्हती. पण त्यांच्या सॉलिसिटर्सकडच्या मीटिंगमधे तरी कळायला हवं होतं. तिथे तर अखिलेश सिंगच्या नांवाचा उल्लेख केला गेला होता. सिनिअर पार्टनर ऑफ 'सिंग असोसिएटस्!' प्रायव्हेट फर्मच्या बाबतीत कांही कळणं तसं कठीणच. पण एवढा मोठा वूलन प्लान्ट.. हया लोकांना कसं शक्य झालं? आता त्याला त्या बुटिकची आठवण आली. म्हणजे निशाच ती डिझायनर आहे तर..

'माझ्या भावाचा अखिलेशचा गारमेन्टचा बिझनेस होताच. गुरगांवला इंन्डस्ट्रियल इस्टेटमधे एक युनिट होतंच. ते

पुढे वाढत गेलं तेव्हां मी त्याला जॉइन्ट झाले. पण मी दिल्लीतच डिझायनर्स कोऑर्डिनेट करायची. '

'पण तुला दिल्लीला जाऊन कितीतरी वर्षं झाली. तेव्हांपासून तू दिल्लीतच आहेस?'

'हो. जवळपास पंचवीस वर्षं मी दिल्लीतच आहे. तशी गुरगांवला जाऊन येऊन असते. आता तर अखिलही दिल्लीतच आलाय्. गेल्या कांही वर्षात आमचा एक्स्पोर्ट वाढलाय्. त्यातही मदत करते. '

'आणि ते बुटिक?'

'ती माझी स्वतंत्र क्रिएशन.. डिझायनर्स कोऑर्डिनेट करतानाच मीही डिझायनिंग करायला लागले. पण ती अलिकडची म्हणजे गेल्या सहासात वर्षातली गोष्ट. मग माझं बुटिक काढलं.

दोनच वर्षांपूर्वी माँ नि बाबूजी दोघंही थोडया अंतराने गेले नि मग गांवाकडची प्रॉपर्टी आम्ही डिस्पोज केली नि तेव्हांच हे बुटिक सुरू केलं. '

'ओह. म्हणजे तुझे बाबूजी.. '

'ही इज नो मोअर नि माँ तर आधीच गेली होती. शेवटी बाबूजी माझ्याकडेच होते. '

' आय् ॲम सॉरी. माझे पपा पण दोन वर्षापूर्वी गेले. ममा आहे. आली असेल ती पण. ॲज वन ऑफ द पार्टनर्स. '

' आय मेट हर. मला तर कसं रिॲक्ट व्हावं तेच कळेना. मी फक्त स्माइल दिलं. '

'इट्स ओ. के. पण हा एवढा मोठा प्लान्ट.. कोण बघणार सर्व? कसं मॅनेज करणार? आणि एकदम वुलन प्लान्टचं कसं काय.. '

'निखिलला बिझनेस एक्पांड करायचाय. माझा प्रॉपर्टी शेअरही इन्वेस्ट करतेय. मी फुल्ली एक्स्पोर्ट बघणाराय्. आम्ही पण तुमच्याच एक्स्पोर्ट हाऊसचे क्लायन्ट आहोत. त्यांच्याच थ्रू पंजाबमधल्या कार्पेट इन्डस्ट्रीत शिरता आलं तर लवकर एस्टॅब्लिश होऊ. '

'फार मोठं प्लॅनिंग आहे तुमचं.'

'कसलं मोठं नि काय. आम्ही साधारण कुटुंबातली माणसं. जमलं तर बघायचं. '

हा त्याला टॉन्ट आहे असं वाटलं पण तिच्या चेहऱ्यावर तसं कांही जाणवलं नाही. फक्त एक विषादाची छटा मात्र होती. पूर्वी केव्हांतरी त्यांचं बोलणं झालेलं त्याला आठवलं. तिला बिझनेस जॉइन्ट करायची हौस होतीच. पण ते अशा रितीने घडायचं होतं तर !

इतक्यात बाहेर मोठा गडगडाट ऐकू आला. त्याने दचकून दोघेही भानावर आले नि दोघानी एकदमच घड्याळाकडे नि लगेच एकमेकांकडे पाहयलं नि दोघेही एकदमच हंसले.

बाहेर पावसाने जोर धरला होता. त्यांच्या जणू जुन्या आठवणी ताज्या झाल्या!

त्याला तिला एकदा तिच्या लग्नाबद्दल विचारावसं वाटलं पण त्याने शब्द गिळले कारण वस्तुस्थिती समोरच होती. तिने एकदाही स्वतःच्या वैवाहिक आयुष्याचा उल्लेख केला नव्हता!

तर तिलाही तसंच कांहीसं विचारावसं वाटलं पण धाडस झालं नाही. झटकन् उठत ती म्हणाली,

‘आपल्याला वर जायला हवं. सगळे वाट पहात असतील. खरं तर ते म्हणजे विशेषतः तुमचे सगळे पार्टनर्स आपापसात चर्चा करत वेळ काढत होते. म्हणजे बहुतेक तुझ्यासाठीच थांबले असावेत. अखिल आमच्या लीगल ॲडव्हाजरशी कांहीतरी डिस्कस करत होता. कारण ॲग्रीमेन्ट त्याने पुरतं वाचलं नसावं.’

‘मग तू खाली कशाला आलीस? मी येणारच होतो. ’

‘ते मला माहित होतं. पण मधे थोडा वेळ आहेसं बघून मुद्दाम खाली आले, तुला सरप्राईज द्यायला. शिवाय टु बी फ्रॅंक, मला तुझ्या ममाला कसं रिॲक्ट व्हावं तेही कळेना. नुसतं स्माइल दिलं नि आले. शी मस्ट बी शॉक्ड टु सी मी हीअर. ऑर रॅदर ॲम्बॅरॅस्ड.’

‘आय डोन्ट थिंक सो. शी इज बियॉन्ड एवरीथिंग नाऊ. स्पेशली पपा गेल्यापासून.’

त्याने उठण्याचा प्रयत्न केला नि तिने अभावितपणेच हात पुढे केला. जणू त्याची गरज तिला माहित होती. नकळतच त्याने त्या आधाराचा स्वीकार केला नि तो उभा राहयला.

हळुहळू चालत लिफ्टकडे जाताना तीही तशीच हळू त्याच्याबरोबर पावलं टाकित होती. क्षणभर त्याला वाटलं, त्यावेळी अशीच साथ अपेक्षित होती. पण ती अर्ध्यावरच हात सोडून गेली. प्राक्तन आणि परिस्थिती दोन्हीही प्रतिकूल होती. कदाचित् दोघानाही...

मीटिंग पार पडली. डील फायनल झालं नि नंतर बुफे. त्याच दरम्यान अमितच्या ममाने निशाला एका बाजूला गांठून बोलण्याचा प्रयत्न केला. पण जुजबी. पूर्वीच्या घटनांबद्दल किंवा इतर कांही बोलण्याचा धीरच झाला नाही. तिनेही आवश्यक तेवढाच प्रतिसाद दिला. अमित दुरूनच तिच्यावर लक्ष ठेवून होता हे तिच्या लक्षात आलं पण मनात कुठलीही कटुता नाही हे दाखवून देण्याचा मुद्दाम प्रयत्नही तिने केला नाही. कारण ती नव्हतीच.

हळुहळू सर्व डिस्पर्स व्हायला लागले तेव्हां दोघानाही जाणवलं की आता निरोप घ्यावा लागणार. बहुतेक दोघांच्याही मनात थोडीफार चलबिचल झाली असावी तेव्हां तिने सेलफोनचा बहाणा केला नि बोलता बोलता ती हळुहळू अमितच्या टेबलाजवळ आली तेव्हां त्याच्याशी बोलणारा अजय उठून दूर झाला नि अमित उठायसाठी प्रयत्न करायला लागला. तिने झटकन् पुढे होऊन हात दिला नि त्यानेही निसंकोचपणे तिचा आधार घेतला. नेमक्या त्याच क्षणी अखिलेशचं लक्ष गेलं पण त्याने चेहऱ्यावर कांही प्रतिक्रिया दिसू दिली नाही. मात्र आंटी सॅन्ड्राबरोबर निघालेली ममा हे पाहून थबकली. तिच्या चेहऱ्यावर एक बारिक स्मितरेषा उमटली !..

'दे नो इचअदर फ्रॉम कॉलेज.' ती सॅन्ड्राला म्हणाली नि निघाली..

'आता पुढे काय प्लॅन आहे?' पॅसेजमधून चालता चालता त्याने विचारलं.

'वेल्. इतर फॉर्मालिटीज भैय्या बघेलच. त्याच्या चकरा होतील बॉम्बेला. '

'मी तुला विचारतोय्. परत केव्हां निघणारेस?'

‘अजून ठरवलं नाही. तशी तिकडेही खूप कामं आहेतच. बॅंकलोन आणि सरकारी परवाना. यासारखी. एकटया भैय्यावर नाही टाकता येणार सगळं. ’

‘तू तर पक्की बिझनेस वूमन झालीस. ’

‘तीच तर माझी ॲम्बिशन होती. ’

‘आय नो इट. पण पर्सनल लाईफ? तुला कधीच वाटलं नाही बॉम्बेला यावंसं?’

‘वाटलं ना. पण काय उपयोग. तशी केव्हांतरी आलेही असेन. पण बाबुजींच्या हट्टवादी स्वभावामुळे.... ’

‘मग आता हयावेळी नाही रहावंसं वाटत?’

‘आता वेळेचा प्रॉब्लेम. पण एखादा दिवस असेन इथेच. बघुया. ’

‘पुन्हा भेटुया?’ सहज वाटावं असं त्याने विचारलं.

‘भेटू कदाचित्.’ तिरक्या नजरेने त्याचा अंदाज घेत ती उत्तरली. तिला वाटलं विचारावं. पावसात भिजायला कां. पण तिने शब्द उच्चारले नाहीत. एवढयात ते लिफ्टजवळ आले. तिथे कुणीतरी होतंच. मग तो विषय राह्यलाच...

खाली आल्यावर त्याला बघून ड्रायव्हरने गाडी पोर्चमधे आणली. पाऊस सुरूच होता. पण आता मंदावला होता. ते हळुहळू चालत गेटजवळ आलेच होते. एकमेकांचा अंदाज घेत. त्याच दरम्यान वीज चमकली नि पुन्हां दोघांनी एकमेकांकडे पाहयलं नि हंसले. पण ते हंसणं केविलवाणं वाटलं. दोघानाही. इच्छा तर होतीच. पण धाडस होत नव्हतं. बाहेर पडण्यापूर्वी एकवार वळून त्याने तिच्याकडे पाहयलं. नि दोघांनी एकदमच उच्चार केला.

'भेटूया?' नि मग दोघं एकदम खळाळून हंसले, अगदी पहिल्यासारखंच.

ड्रायव्हरच्या लक्षात आलं आज साहेबाचा मूड ठीक दिसतोय्. त्याने गाडी स्टार्ट केली.

ती कितीतरी वेळ बघत राहयली...

.. दुसरा दिवस कसाबसा संपवून अमित घरी आला. मनात हुरहूर घेऊन. आज निशा परत गेली असेल कां? जाण्यापूर्वी फोन करायला हवा होता. पण आपला नंबर..

चुकलंच. कार्ड द्यायला कसे विसरलो. आणि तिनेही मागितलं नाही. म्हणाली तर होती भेटूया म्हणून. आता भेटेल ती पुन्हा?

झटकायचे म्हटलं तरी त्याला निशाचे विचार अगदीच झटकून टाकणं अवघड होतं.

एक गोष्ट मात्र होती. एवढे दिवस संपर्क नसल्यामुळे असेल कदाचित् पण पहिल्यासारखी हुरहूर नव्हती वाटत. नाहीतरी न बोलता दोघानी नियतीचा निर्णय स्वीकारला होताच की.

नियतीचा कि आडमुठया मोठया माणसांचा? कारण तीसुद्धा बाबुजींबद्दल असंच कांहीतरी बोलली होती.

तिचा विचार करतच पण नेहमीप्रमाणेच तो कॉफीचा मग घेऊन हॉलच्या टेरेसमधे उभा राहयला, समोर समुद्राकडे पहात. समुद्र शांत होता पण गढुळल्या पाण्याला लाटांची शुभ्र किनार होती. परत परत किनाऱ्याकडे येऊन विरून जाणारी.

त्याच्या विचारांसारखीच. वर पावसांच्या रेशीमधारा. शांत होणाऱ्या पाण्यावर तरंग उठवणाऱ्या, अगदी भिजण्याचा मोह व्हावा अशा. त्याला निशाची तीव्रतेने आठवण आली. पण काय उपयोग. आता तो बाईकवर मरीनड्राईव्हपर्यंत जाऊ शकत नव्हता...

बेल वाजलेली त्याने ऐकली. असेल कोणीतरी. पण नोकर दरवाजा उघडेल म्हणून त्याने दुर्लक्ष केलं. थोडा वेळ गेला. नोकराच्या बोलण्याचा आवाज त्याने ऐकला होता. तो कानोसा घेत थांबला नि वळला तो त्याला आश्चर्याचा धक्का बसला.

साक्षात् निशा समोर नि तीही भिजलेली.

'निशा तू? नि अशी भिजलेली?' तो चित्कारला.

'म्हटलं होतंस ना पुन्हा भेटुया म्हणून? आणि तुला नाही वाटलं भिजावंसं?'

'खूप वाटलं. तसं नेहमीच वाटतं. म्हणून तर असा पाऊस असला कि इथे टेरेसमधे उभा रहातो. नुसत्या आठवणी जागवत. थोडासा शिडकावा मनाला शांत करतो. पण ते भिजायचे दिवस मागे पडले हयाची खंत वाटते. आता मला मदतीशिवाय कुठेच जाता येत नाही. '

'पण याचसाठी तर भेटूया म्हटलंस् ना?'

त्याने चमकून तिच्याकडे पाहयलं. नि एक निश्वास सोडला. अंगाला चिकटलेली ओढणी

ती चक्क बाल्कनीच्या फरशीवर पिळून टाकत होती. अगदी त्या दिवसांसारखीच. त्याला कळेना काय बोलावं. मग सहज म्हटल्यासारखं म्हणाला.

'आता आधी कोरडी हो नि गरम कॉफी घे. '

ती चमकली. तिला आठवलं माई असंच कांहीतरी म्हणायच्या. इथेच. ह्याच घरात. दोघानी एकमेकांकडे पाहयलं नि बऱ्याच गोष्टी जाणल्या, शब्दांशिवायच.

'चल. आता येतोस? मी तुला मदत करते. आपण तुझ्या कारने जाऊ. मी ड्राईव्ह करीन. '

'आलो असतो. पण आता नाही जावंसं वाटत. कुठेच. '

अंधार पडायला लागला होता नि आता पुन्हा खाली उतरायचं अगदी जिवावर आलं होतं.

'त्यापेक्षा इथेच बसूया बोलत. तेवढाच तुझा जास्त सहवास. पण त्यासाठी तुला आधी कपडे बदलायला हवेत. नाहीतर आजारी पडशील. '

'त्याची नको तुला काळजी. ' निशा तुटक बोलली असं त्याला वाटून गेलं.

'खरंय् तुझं. आता मी तुझी काळजी घेण्याएवढा समर्थ नाही. म्हणूनच तुझ्या बाबुजीनी.. '

'जाऊ दे तो विषय. नियती! दुसरं काय. '

'पण त्याच नियतीने आपली पुन्हा भेट घडवून आणलीच ना. '

'नियतीच्या मनात कांहीतरी चांगलंच असेल. '

'पण त्याला आता खूप उशीर झालाय्. '

'प्रेमात कधीच उशीर होत नसतो. शरिराने नाही तरी मनाने ते स्वीकारलेलं असतंच.

कायमचं.. '

'म्हणूनच तू अजून अशीच राहयलीस? हया पांगळया प्रेमासाठी?' तो धीर करून बोललाच.

'प्रेम पांगळंही नसतं डिअर. पांगळी असताता ती माणसं. विचाराने. ते जाऊ दे. मी अशीच राह्यले कारण बाबूजींच्या विरोधात जाऊन कांही करायचं तर घराबाहेर पडायची तयारी ठेवायला हवी होती. त्यासाठी तुझा आधार हवा होता. तुला तर स्वतःलाच आधाराची गरज होती. अशा परिस्थितीत लग्न नाकारणं हा एकच पर्याय होता. '

'मग तू इकडे निघून कां नाही आलीस?'

'इकडे यायचं तर आत्मसन्मान आड येत होता. तू त्याला हवं तर ईगो म्हण. पण मलाही स्वतःला सिद्ध करायचंच होतं. शिवाय लग्न नाकारून मी नकळतच बाबूजींचाही सूड घेतला.

भावना सुडाची नसेल कदाचित्. पण परिणाम तोच. मी स्पष्टिकरण देत किंवा मागतही नाहीय् तुझी भेट होणार हेच माझ्यासाठी महत्वाचं होतं. '

आपण फार बोललो असं वाटून ती थांबली. तेव्हां त्याच्या लक्षात आलं ती अजूनही ओल्या कपडयातच आहे.

'उशिरा कां होईना आपण भेटलोच शेवटी. मला तुझं बुटिक बघूनच हुरहूर वाटली होती. ठीकाय् म्हणायचं. बेटर लेट दॅन नेव्हर... '

'आता मात्र मला खरंच लेट होतोय्. कपडे राहू देत. पण तुझी कॉफी केव्हां येणाराय्?'

कॉफी पिताना तिने म्हटलं. 'मी आले होते तुला इन्व्हाइट करायला. आय मे लीव्ह आफ्टर अ डे. पण सगळया फॉर्मालिटीज पूर्ण झाल्यावर आम्ही कंपनीचं नांव बदलणार आहोत. त्यापूर्वी भैय्याला बॉम्बेला यावंच लागेल. तुमचं रजिस्ट्रेशन बॉम्बेचं. इथल्या ऑथॉरिटिज्शी कॉन्टॅक्ट करावा लागेलच ना. माझं बोलणं झलंय् भैय्याशी. तेव्हां पुढचं आमंत्रण आताच देऊन ठेवते. कारण इनॉग्युरेशन तुझ्याच हातून व्हावं अशी माझी इच्छा आहे. नाही म्हणू नकोस. प्लीज. '

त्याच्या हातातला कॉफीचा मग तसाच राहयला. तिच्या प्रेमाची ही अजब त-हा त्याला अवाक् करून गेली.

'चल. निघते मी. वेळेवर हॉटेलवर गेलेलं बरं. पण तुझा कॉन्टॅक्ट नंबर देऊन ठेव. काल भेटूया म्हणालास नि नंबर द्यायला विसरलास तरी आलेच. तुझं घर माहित होतं. '

त्याने नोकराला सांगून ब्रीफकेस मागवली नि आपलं कार्ड काढून दिलं. तिनेही मग आपलं कार्ड दिलं नि म्हटलं, 'माझा सेलफोन नाहीय्. पण तुझा आहे ना. माझा आला की कळवीनच. चालेल ना?'

'बाय ऑल मीन्स. पण तिकडे मी एकटा कसा येणार?'

'इथे तुला कुणीही बसवून देईलच. आणि नागद्याला तुझ्या पायखालचा रस्ता आहे. शिवाय एकदा तिकडे एअरपोर्टवर तुला रिसिव्ह केलं की सगळी जबाबदारी माझी. ओ. के.?'

त्याने फक्त मान हलवली. त्याला बोलण्यासाठी तिने कांही शिल्लकच ठेवलं नव्हतं.

डायनिंग चेअरवरून उठताना तिने पुन्हा त्याला हात दिला. अगदी संवय असल्यासारखा !

त्याचा नियतीवरचा विश्र्वास दृढ व्हायला लागला होता. तिला द्वारापर्यंत सोडून तो मागे वळला नि त्याच्या लक्षात आलं ती तशीच ओलेती परत गेली. पाऊस अजूनही थांबला नव्हता.

भलतीच बोल्ड झाली होती तर.

.... ठरल्याप्रमाणे तिचा फोन आला. त्यापूर्वीही फोनवर बोलणं झालंच होतं. तो आधी दिल्लीला गेला. तिच्या बुटिकला भेट दिली. पण रहायला मात्र हॉटेलमधेच. ते त्यानेच बुक करून ठेवलं होतं.

तिथून नंतर भोपाळवरून पुढे नागद्याला. चार दिवस तिची कंपनी आणि अखंड बडबड. अखिलेशशीही एक मुलाखत झाली. आपल्या पूर्वीच्याच गेस्ट हाऊसमधे रहायला आता त्याला परकं वाटायला लागलं होतं. आता फॅक्टरीशी संबंध संपला होता म्हणून असेल कदाचित्. निघण्यापूर्वी त्याने ममाला कळवलं होतं. त्यामुळे आशेवर असलेल्या ममाने मधेच फोन केला होता. आपण तुटक उत्तरं दिली असं त्याला उगाच वाटून गेलं.

उद्घाटनाचा दिवस उगवला. गाडी मेनगेट मधून आत गेल्यावर समोर त्याचाच एकेकाळचा फॅक्टरी मॅनेजर सामोरा आला.

‘वेल्कम मिस्टर अमित. नाईस मीटिंग यू अगेन. ’

त्याला एकदम ऑम्बॅरेसिंग वाटलं. एकदा निरोप घेऊन गेल्यावर परत हे स्वागत स्वीकारणं जरा विचित्र वाटलं.

नुसतं हंसून त्याने प्रतिसाद दिला. ऑफिस बिल्डींगच्या गेटची सजावट लक्ष वेधून घेत होती. तिथे निशा उभी होतीच, त्याला रिसिव्ह करायला.

ती आधीच पोहोचली होती. जवळ गेल्यावर त्याचं लक्ष गेलं. पिलरवर ब्रासचा बोर्ड कव्हर केलेला दिसत होता. टु बी सरप्राईज्ड, अखिलेशची फॅमिलीही हजर होती. निशाने तिच्या भाभीशी ओळख करून दिली. एवढयात अखिलेश समोर आला नि त्याने रिक्वेस्ट केली.

अमितने जवळ जाऊन कर्टन दूर केला. टाळयांचा कडकडाट झाला. उत्सुकतेने त्याने नांव पाहयलं. ''अमितेश वूलन्स लि. ''

त्याने चमकून निशाकडे पाहयलं. तिच्या नजरेत मिस्किल भाव होता. शिवाय अखिलेशही हंसून पहात होता. आता मात्र त्याच्या चेहऱ्यावरचे भाव भराभर बदलले. आश्चर्य नि आनंद. नुसतंच समाधान कि कृतार्थता. त्याला कांहीच समजेनासं झालं. काय प्रतिक्रिया व्यक्त करावी हेच कळेना. निशाच समोर आली, स्वीट घेऊन ! नकळतच त्याचा हात पुढे झाला. स्वीट साठी नव्हे, तिचं अभिनंदन करण्यासाठी. तिने हात पुढे केला पण आधारासाठी. आत जाण्यासाठी, भारावल्यासारखा तिचा हात हातात घेताना एकवार वळून त्याने पुन्हा बोर्डकडे नजर वळवली नि त्याचे डोळे भरून आले, अवेळी येणाऱ्या पावसासारखे.

त्याची नजर लोकांच्या गर्दीच्याही पलिकडे गेली. त्याला वाटलं आभाळ खरंच भरून आलंय. कुठच्याही क्षणी कोसळण्यासाठी.

'भिजायचंय् का परत? हया थंडीच्या दिवसात सरत्या पावसाची एखादी सर येते इथे. ' तिच्या स्वरात मिस्किलपणा होता

कि फक्त निर्मळ भाव हे ठरवणंही अवघड होतं. इतक्यात निखिल समोर आला. अमितने त्याल्याही कॉंग्रॅच्युलेशन करण्यासाठी हात पुढे केला.

'नाऊ ॲटलिस्ट फॉर नेमसेक यू आर माय पार्टनर. सो कॉंग्रॅच्युलेशन टू यू आल्सो. '

सगळी गर्दी पांगली नि आत गेली तेव्हां नकळतच त्याचा हात निशाच्या खांद्यावर विसावला.

आधारासाठी..

@@@

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी ही एक सशक्त भाषा आहे. सशक्त म्हणजे – जे भाव मनात आहेत ते अत्यंत तरलपणे आणि अचूकपणे सांगण्याची क्षमता असणे. उदाहरणारर्थ या भाषेत बोलणे एकाच कृतीला बोलला, सांगितले, म्हणाला, सुनावले, ऐकवले, उच्चारले, स्पष्ट केले, बोलून टाकले, सुचवले, कुजबुजला, पुटपुटला, असे असंख्य शब्द आहेत आणि या प्रत्येक शब्दाला एक स्वतःची अशी अर्थछटा आहे. आपण जेव्हा आपली भाषा वापरतो तेव्हा या छटा आपण व्यवस्थित बोलू व समजू शकतो. म्हणून मराठी साहित्याचा , वाचनाचा , पुस्तकांचा प्रचार आणि प्रसार भरपूर व्हायला हवा. म्हणजे आता आहे त्याच्या निदान दहा हजार पट. सध्याचा आपला साहित्य व्यवहार हा अगदीच छोट्या विहिरीपुरता मर्यादित झाला आहे. त्याला एखाद्या विशाल महासागराचं रूप द्यायचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आम्हाला तुमची मदत हवी.

ई साहित्यची पुस्तकं विनामूल्य आहेत. ती तुम्ही कोणालाही कितीही देऊ शकता. त्यात दानाचं पुण्य मिळेल आणि खिशाला फ़ारसा खार न लावता. कृपया आपल्या ओळखीच्या किंवा माहितीतल्या लोकांना, संस्थांना, शाळांना, वाचनालयांना, कार्यालयांना , सोसायट्या, गावं, नगरपालिका, ग्रामपंचायत, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळं यांत ई साहित्यची पुस्तकं पसरवा. त्यांची माहिती पुरवा. आमचे प्रतिनिधी व्हा. (मात्र बिनपगारी फ़ुल अधिकारी).

साहित्य प्रसाराचा हा बांध फ़ुटु दे. वाचू दे लोकांना. मराठी भाषा वैभवशाली होऊ दे.

काहीही मदत लागली तर आम्ही आहोतच. आपल्या उपक्रमांचे फ़ोटो आम्हाला पाठवा.

धन्यवाद

टीम ई साहित्य